जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## हल्ल्याचा प्रतिशोध घ्यावा!

पहेलगाममध्ये झालेला आतंकवादी हल्ला देशाच्या अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेचे वाभाडे काढणारा आहे. भारताचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या काश्मीरमध्ये उन्हाळ्याच्या दिवसात पर्यटक येथील सौंदर्य आणि गारवा अनुभवण्यासाठी येत असतात. यातून राज्यासह देशाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. आतंकवाद्यांनी पर्यटकांना लक्ष करून काश्मीरविषयी भय निर्माण केले आहे. यातून भविष्यात काश्मीरमध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या नक्कीच रोडावणार आहे ज्याच्या परिणाम देशाच्या महसूलावर होणार आहे. काश्मीरमधून ३७० कलम काढल्यानंतर काही काळातच तेथील परिस्थिती भयमुक्त केल्याच्या वल्गना केंद्र सरकारकडून केल्या जात होत्या; मात्र या हल्ल्याने त्या सपशेल फोल ठरवल्या.

आतंकवादाला धर्म नसतो हे लहानपणापासून आम्हाला शिकवले गेले, मात्र काश्मीरमध्ये झालेल्या हल्ल्यात आतंकवाद्यांनी पर्यटकांना त्यांचे धर्म विचारून केवळ हिंदूंना लक्ष केले हेही आता स्पष्ट झाले आहे. स्वातंत्र्यानंतर आतंकवाद्यांनी आजतागायत देशभरात हजारो निरपराध नागरिकांची हत्या केली आहे. स्त्रिया आणि बालकांनाही त्यांनी सोडलेले नाही. हजारोंचे संसार उध्वस्त केले आहेत. देशाच्या संपत्तीची अपरिमित हानी केली आहे. स्वातंत्र्यानंतर आजतागायत अनेक सरकारे आली आणि गेली मात्र आतंकवादाचा बिमोड करणे कोणालाही शक्य झालेले नाही. पहेलगाम हल्ल्यानंतरही समस्त राजकीय मंडळींनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केले आहेत. विरोधी पक्षांनी सत्तास्थानी असलेल्या भाजपला लक्ष केले आहे. पंतप्रधानांनीही आतंकवाद्यांना सोडणार नसल्याचे विधान केले आहे. देशाचे गृहमंत्री हल्ल्यानंतर तात्काळ श्रीनगरमध्ये दाखल झाले.

आतंकवादी हल्ल्यानंतर तीव्र निषेध करणे, मेणबत्या पेटवणे, मोर्चे काढणे, सोशल मीडियावर चिड व्यक्त करणे आता पुरे झाले. भारतीयांना या हल्याचा प्रतिशोध हवा आहे तोही इस्त्रायल सारखा. इस्त्रायलवर ज्या आतंकवादी तळावरून हल्ला होतो तो तळच इस्त्रायल उध्वस्त करते. ज्यू नागरिक जगाच्या पाठीवर कुठेही रहात असला तरी तो स्वतःला सुरक्षित समजतो कारण त्याच्या पाठीशी त्याचा देश उभा असतो. चोहोबाजूनी बलाढ्य शत्रूराष्ट्रांनी वेढला असूनही इस्त्रायलने या देशांवर आपला दरारा कायम ठेवला आले. त्या तुलनेत भारत बलशाली असतानाही भारतात अधूनमधून कुठेना कुठे आतंकवादी हल्ले होतच असतात. भारतानेही आता इस्त्रायलप्रमाणे बाणेदारपणा अंगीकारला पाहिजे. देशात राहून शत्रूराष्ट्राशी इमान राखणाऱ्या, आतंकवाद्यांना आश्रय देणाऱ्या स्थानिक देशद्रोह्यांनाही जन्माची अद्दल घडवायला हवी. आतंकवाद्यांच्या आश्रयस्थानांवर हल्ला करून त्याचे समूळ उच्चाटन करणे आणि आतंकवाद पोसणाऱ्या पाकिस्तानला कायमची अद्दल घडवणे हाच या हल्याचा प्रतिशोध असून भारताने त्यादृष्टीने सिद्धता करायला हवी!

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
"मुसाफिर"-९८२२०२०६९१



### २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिन

''जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाची भाकरी घ्या आणि एक रुपयाचं पुस्तक घ्या. कारण भाकरी तुम्हाला जगायला मदत करेल तर पुस्तक कसं जगायचं हे सांगेन.''

डॉ. बाबासाहेबांचे हे जगप्रसिद्ध विधान आपण फक्त सुविचार म्हणूनच पाहणार आहोत काय? या विधानाचा गर्भितार्थ कधीतरी अंगिकारणार का? किमान पुस्तकांचे महत्त्व, चिंतन, मनन, त्यांनी भागणारी बौद्धिक, मानसिक भूक याशिवाय विविध पुस्तकांमुळे वाढणाऱ्या जाणिवेच्या कक्षा.

जीवनाचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत का आपण? ही कळकळ व चळवळ व्हावी.

आज २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिनानिमित्त छोटासा संकल्प करू या. रोज काहीतरी वाचून नवनवीन गोष्ट आत्मसात करू या.

पालकांनो, आता सुट्ट्यांमध्ये स्वतः पुस्तके आणून-वाचून आपल्या मुलांनाही प्रेरणा द्या. मोबाईलच्या महाजालात तर वाचन अधिकच आवश्यक बनलंय. किमान वृत्तपत्रांतील चांगले लेख, पुरण्यांवर कुटुंबात चर्चा झाली पाहिजे. सुदैवाने सध्या सर्वदूर वाचन मोहीम, पुस्तक मेळावे वाढली आहेत.

आजच्या शुभदिनी जास्तीत जास्त वेळा ग्रंथालयरूपी ज्ञानपोइत मुलांसह जाण्याचा विचार व प्रयत्न करा याच पुस्तक दिनाच्या मनापासून शुभेच्छा! **- किशोर गांधी**

# दहशतवादी हल्ल्याचा हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून निषेध

### भिंगारमध्ये शोक सभा घेवून बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली; शांतता भंग करणाऱ्या शक्तींना ठोस उत्तर देण्याची मागणी



काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या निर्घृण दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले.

नगर - काश्मीर खोऱ्यातील पहलगामजवळील बायसरन भागात झालेल्या निर्घृण दहशतवादी हल्ल्याचा निषेध करत हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. या हल्ल्यात बळी पडलेल्या २८ निरपराध नागरिकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

या शोकसभेसाठी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, रमेश वराडे, रतन मेहेत्रे, मेजर दिलीपराव ठोकळ, दिपकराव धाडगे, जहीर सय्यद, सुधीर कपाळे, अशोकराव पराते, विलासराव आहेर, सर्वेश सपकाळ, दीपकराव घोडके, अभिजीत सपकाळ, विकास भिंगारदिवे, सरदारसिंग परदेशी, अविनाश जाधव, अविनाश पोतदार, दिलीप गुगळे, प्रकाश देवळालीकर, शेषराव पालवे, रामनाथ गर्जे, कुमार धतुरे, योगेश चौधरी, मुन्ना वागस्कर, दशरथराव मुंडे, नामदेवराव जावळे, अमोल सकपाळ, संतोष वीर, अनिल शिरसाठ, पंडितजी आदी उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, काश्मीरमध्ये सातत्याने अशांतता माजवण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. पाकिस्तानसारखे शत्रूराष्ट्र दहशतवादी संघटनांना पाठीशी घालून भारताची एकता, शांतता आणि अखंडतेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न करत आहे. धर्माच्या नावावर निरपराध नागरिकांवर हल्ला करणे हे केवळ कायरतेचे लक्षण आहे. याचा आम्ही तीव्र निषेध करतो. केंद्र सरकारने अशा हल्ल्यांमागील शक्तींना शोधून काढून कठोर शासन करण्याची मागणी केली.

सभेत सर्वांनी एकमताने हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करत केंद्र सरकारने दहशतवादी संघटनांवर व त्यांना पाठबळ देणाऱ्या शत्रू राष्ट्रांवर कारवाईची मागणी केली. दहशतवाद्यांचा हेतू म्हणजे भीती निर्माण करून समाजात अस्थिरता पसरवणे. मात्र, भारतवासीय एकदिलाने याला प्रत्युत्तर देतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तर सभेच्या अखेरीस उपस्थित सर्वांनी मौन पाळून हल्ल्यात बळी गेलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहिली. तसेच, भविष्यात अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी सरकारने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणीही करण्यात आली.

# पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा अहिल्यानगर टुरिझम फोरमतर्फे निषेध : जिल्ह्यातील पर्यटक सुरक्षित

नगर - काश्मीर राज्यामध्ये पहलगामच्या बैसारन घाटी मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा अहिल्यानगर टुरिझम फोरमच्या वतीने तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला आहे. खरं म्हणजे काश्मीरमध्ये भारतातील पर्यटकांवर दहशतवादी हल्ला कधीच झालेला नव्हता ही पहिलीच वेळ होती अशी घटना कधीच घडलेली नाही. मात्र काल झालेली घटना ही अत्यंत दुर्दैवी असून यामध्ये अनेक पर्यटकांचा बळी गेला आहे. यातील मृत पावलेले व जखमी झालेले अनेक पर्यटक हे महाराष्ट्रातील आहेत. त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबाची खूप मोठी हानी झाली आहे. त्या मृत त्म्यास शांती लाभो आणि यातून कुटुंबाला लवकर बाहेर पडण्याची शक्ती ईश्वर त्यांच्या कुटुंबाला देवो.

तेथील स्थानिक मंडळींनी तसेच त्या व्यवसायावर अवलंबून असलेल्या मंडळींनी तातडीने मदती दिल्या आमच्या तेथील एजन्सीने सुद्धा तातडीने आम्हाला फोन केले व मदतीचा हात पुढे गेला सुदैवाने आज सकाळपर्यंत माझ्या माहितीनुसार तिथे गेलेले आमच्या फोरमच्या सर्व सदस्यांचे पर्यटक सुरक्षित आहे असे त्यांनी मला कळवले आहे. आमच्या व्यतिरिक्त अनेक लोक वैयक्तिक रित्या जात असतात. अशा काही घटना घडल्या तर प्रशासन आम्हाला विचारते आम्ही त्यांना माहिती देतो जर अशा काही घटना घडल्या तर प्रशासन तातडीने दखल घेते. यासाठी स्वतंत्र मुदत पुनर्वसन केंद्र कार्यरत असते. जर कोणी स्वतंत्र गेले असेल अशावेळी आम्ही फोरमचे सर्व सदस्य त्यांना मदतीचा हात देऊ.

या भ्याड हल्ल्याच्या संदर्भात स्थानिक राज्य व केंद्र सरकारने तातडीने गांभीर्याने पावले उचलणे गरजेचे आहे. कोविड नंतरच्या काळात पर्यटन मोठ्या प्रमाणात वाढले त्यामुळे प्रत्येक राज्यामध्ये स्थानिक नागरिकांना याचा फायदा झाला. काश्मीरचे पर्यटन यावर्षी खूप मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे अजूनही पुढे पर्यटक जाणार आहेत मात्र या परिस्थितीमुळे ते भयभीत झाले आहेत. अशावेळी सर्वत्र कडक बंदोबस्त करण्यात यावा. आणि यानिमित्ताने पर्यटकांना सुद्धा आवाहन राहील की आपला प्रवास सुरक्षित कसा होईल याची काळजी आम्ही पर्यटन कंपन्या घेत असतो. आपणही तेथे सुरक्षेची काळजी घ्यावी. यामध्ये सुदैवाने आपल्या जिल्ह्यातील कोणी पर्यटक त्या ठिकाणी नव्हते. हे आजपर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार मला कळते आहे की जे पर्यटक नगर जिल्ह्यातील गेले आहेत ते सुरक्षित आहेत. अशी माहिती फोरमचे संस्थापक किशोर मरकड यांनी दिली.

या हल्ल्याचा फोरमच्या अध्यक्ष निलेश वायकर, सचिव सागर सहानी, खजिनदार हेमंत धोका, सदस्य हर्षद भंडारी, वैभव जोशी, गिरीश कोठारी, प्रसाद मांढरे, दिनेश शिंदे, ईश्वर धोका, मनयुग सिंग, विकास सांगळे, शामराव क्षीरसागर, सचिन मस्के, मुकेश बजाज, श्रीकांत गोरडे, सचिन म्हस्के यांनी निषेध व्यक्त करून श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नगरमध्ये पोलिस यंत्रणा 'अलर्ट'

### महामार्गावर चौकाचौकात नाकाबंदी करत वाहनांची कसून तपासणी



नगर शहरात इम्पेरियल चौक येथे अचानक नाकाबंदी करत वाहनांची कसून तपासणी करताना कोतवाली पोलिसांचे पथक. (छाया - बबलू शेख)

नगर - जम्मू - काश्मीर मधील पहलगाम मध्ये २२ एप्रिलला दुपारी पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात २८ जण मृत्युमुखी पडले. त्यात महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश असून या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पोलिस यंत्रणा अलर्ट झाली आहे. नगर शहरातही पोलिस यंत्रणेने दक्षता घेत शहरातून जाणाऱ्या महामार्गांवर चौकाचौकात सायंकाळी अचानक नाकाबंदी करत वाहनांची तपासणी मोहीम राबविली.

कोतवाली पोलिसांनी इम्पेरियल चौक येथील नाकाबंदीत फॅन्सी नंबर प्लेट, काळ्या काचा असलेली चारचाकी वाहने, तसेच संशयित वाहनांची कसून तपासणी केली. यावेळी फॅन्सी नंबर प्लेट, विनाक्रमांकाची वाहने, ट्रिपल सीट जाणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच काळ्या काचा असलेल्या चारचाकी वाहनांवर दंडात्मक कारवाई करत काचांवर लावलेले ब्लॅक फिल्म काढण्यात आल्या.

कोतवालीचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, महिला पोलिस उपनिरीक्षक शितल मुगडे, पोलिस अंमलदार विजय काळे, गुलाब शेख, प्रशांत बोरुडे, विशाल दळवी, सोमनाथ केकान, सोमनाथ राऊत, लक्ष्मण बोडखे, महिला अंमलदार योगिता साळवे, श्वेता परमासागर यांच्यासह पोलिसांच्या पथकाने सायंकाळी ५ ते रात्री ९ वाजेपर्यंत ही मोहीम राबविली.

नाकाबंदीची ही मोहीम सातत्याने अचानक पणे राबविण्यात येणार असून वाहनचालकांनी फॅन्सी नंबर प्लेट, वाहनांना काळ्या काचा लावू नये, ट्रिपल सीट टू व्हीलर वर फिरू नये, वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी केले आहे.

दरम्यान तोफखाना पोलिसांनीही पाईपलाईन रोडवरील भिस्तबाग चौक येथे नाकाबंदी मोहीम राबविली. या मोहिमेत अनेक वाहनांची तपासणी करण्यात आली. तसेच यावेळी क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवून अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या ओमेनी कार चालक अन्सार बाबुलाल पठाण (वय ५५, रा. पोखर्डी ता. नगर) याच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.



पहलगामच्या पर्यटकांवरील हल्ल्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ निषेध करून दहशतवाद्यांच्या बॅनरला जोडे मारून दहन करण्यात आले. (छाया - लहू दळवी)

## पहलगामच्या पर्यटकांवरील हल्ल्याचा निषेध करून नगरमध्ये दहशतवाद्यांच्या बॅनरला जोडे मारून दहन

नगर - जम्मू-काश्मीरच्या पहलगाम परिसरामध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून पर्यटकांवर भ्याड हल्ला झाला असून त्यामध्ये निष्पाप नागरिकांचे बळी गेले आहे. याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ निषेध करून दहशतवाद्यांच्या बॅनरला जोडे मारून दहन करण्यात आले. यावेळी प्रा. माणिकराव विधाते, अभिजीत खोसे, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, विपुल शेटिया, सुरेश बनसोडे, आशाताई निंबाळकर, अरविंद शिंदे, मंगेश खताळ, सागर गुंजाळ, युवराज शिंदे, वैभव ढाकणे, अजय दिघे, मळू गाडळलकर, संजय सपकाळ, संजय मोरे, मयूर कुलथे, जॉय लोखंडे, अमित खामकर, ऋषीकेश ताठे, साधना बोरुडे आदी उपस्थित होते

पाकिस्तानी अतिरेक्यांनी जम्मू-काश्मीर-मध्ये पर्यटकांवर भ्याड हल्ला केला असून आत्तापर्यंत असे कधीही घडले नव्हते असे कृत्य अतिरेक्यांनी केले आहे. केंद्र सरकारने कडक पावले उचलून अतिरेक्यांचा खतमा करणे गरजेचे आहे, याचबरोबर जगाच्या नकाशावरून पाकिस्तानचा नायनाट केला पाहिजे, पुन्हा अशी कृत्ये होणार नाही यासाठी सरकारने कठोर पावले उचलणे गरजेचे असल्याचे मत प्रकाश भागानगरे यांनी केले.

## सूर्यकांत मुनगेल यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - चितळे रोड येथील रहिवासी सूर्यकांत नरसय्या मुनगेल (वय ७९) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. राजू, नरेश, विनायक मुनगेल यांचे ते वडील होत. ते पद्मशाली समाजात विवाह जुळविण्याचे काम मोठ्या हिरीरीने करीत होते.

## रमाकांत (बापूसाहेब) धर्माधिकारी यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील रहिवासी रा.स्व.संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक, हिंद सेवा मंडळांच्या बा.ग.कल्याणकर नाईट हायस्कूलचे माजी प्राचार्य व शां.ज.पाटणी विद्यालय (मॉडर्न हायस्कूल) चे माजी पर्यवेक्षक, गोपाळनगर, जुनी ब्लड बँक शेजारी, श्रीरामपूर येथील रहिवासी रमाकांत (बापूसाहेब) केशव धर्माधिकारी (वय ९४) यांचे वृद्धापकाळाने पुणे येथे दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली सुषमा व शुभांगी, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिरीष, संजय व गिरीश धर्माधिकारी यांचे वडील, मॉडर्न हायस्कूलचे सेवा निवृत्त पर्यवेक्षक अशोक धर्माधिकारी व पुणे बहि:शा शिक्षण मंडळाचे व्याख्याते अरुण धर्माधिकारी यांचे चुलते होत.

# पहलगामच्या हल्ल्याचा दिल्लीगेट येथे शिवसेनेतर्फे निषेध व निदर्शने




पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्याचा दिल्लीगेट येथे शिवसेनेतर्फे निषेध व निदर्शने करण्यात आली.

### निष्पाप पर्यटकांची हत्या करणाऱ्या अतिरेक्यांना घरात घुसून गोळ्या घाला : जिल्हाप्रमुख अनिल शिंदे

नगर - अतिरेक्यांचा हेतू एकच असतो, देशात भीती निर्माण करणे, दहशत पसरवणे आणि शांती बिघडवणे. अशा लोकांशी संवाद साधणे, त्यांना समजावणे, हे उपाय अनेकदा अपयशी ठरले आहेत. जेव्हा संवाद आणि कायदेशीर प्रक्रिया अयशस्वी होतात तेव्हा कधीकधी कठोर निर्णय घ्यावे लागतात, असे कठोर निर्णय आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह हे घेतीलच पण निष्पाप पर्यटकांची हत्या करणार्या अतिरेक्यांना घरात घुसून गोळ्या घातल्या पाहिजे. जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ला हा फक्त हिंदूस्थानातील हिंदूसाठी होता. अशा अतिरेक्यांना आणि त्यांना साथ देणार्यांना जसाच तसे उत्तर देण्यात यावे, असे प्रतिपादन शिवसेना जिल्हा प्रमुख अनिल शिंदे यांनी केले.

जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्याचा शहर शिवसेनेच्यावतीने दिल्लीगेट येथे निषेध व्यक्त करुन निदर्शने करण्यात आले. यावेळी अनिल शिंदे, संपर्क प्रमुख दिलीप सातपुते, माजी शहरप्रमुख संभाजी कदम, संजय शेंडगे, गणेश कवडे, बाळासाहेब बोराटे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, संतोष गेनप्पा, रामदास भोर, दत्ता कावरे, परेश लोखंडे, सुरेश तिवारी, अशोक दहिफळे, सुरेश क्षिरसागर, ओंकार शिंदे, अरुण झेंडे, गौरव ढोणे, कैलास शिंदे, आण्णा घोलप, अभिजित अष्टेकर, रणजित परदेशी, संजय आव्हाड, अविनाश भिंगारदिवे, अक्षय भिंगारे आदी उपस्थित होते.

यावेळी संभाजी कदम म्हणाले की, पहलगाम येथील हल्याचा निषेध म्हणून आम्ही आज दिल्लीगेट येथे निदर्शने केले. पहलगाम येथील भ्याड हल्ला हा फक्त हिंदुस्थानातील हिंदूसाठी होता जर हिंदूंवर असे भ्याड हल्ले होत असतील आता हिंदूही गप्प बसणार नाही. या हल्यामध्ये पर्यटकांना विचारण्यात येत होते की, तु कुठला .... मी हिंदूस्थानातील आहे, आणि त्यातल्या त्यात हिंदू असणार्यांना गोळ्या घालत होते. हे अत्यंत दुर्दैवी आहे. अशा अतिरेक्यांना पकडून त्यांना भर चौकात फाशी दिली पाहिजे.

यावेळी दिलीप सातपुते म्हणाले की, अतिरेकी धर्म विचारुन गोळ्या घालत होते. यामध्ये हिंदस्थानातील अनेक हिंदू मारले गेले. या भ्याड हल्लाचा शहर शिवसेनाच्यावतीने निषेध करण्यात येत आहे. पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक करुन त्या अतिरेक्यांना मारले पाहिजे, हिच खरी श्रद्धांजली ठरेल या हल्यात बळी गेलेल्या पर्यटकांना, असे ते म्हणाले.

यावेळी बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, शाम नळकांडे, गौरव ढोणे आदींनी या हल्याचा निषेध व्यक्त केला. यावेळी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# गृहिणी

## आरोग्य

### प्या माठातले पाणी

माठाची सच्छिंद्र रचना पाण्याला नैसर्गिकरित्या थंड ठेवते. माठातील पाणी पचनासाठी उत्तम, बद्धकोष्ठता व पोट फुगण्याच्या त्रासावर नैसर्गिक उपाय आहे. माठातील थंड पाणी शरीर हायड्रेट ठेवते तसेच उन्हाळ्यातील थकवा दूर करते. शिवाय माठाला गंज लागत नाही, कळकटपणा नाही माठ स्वच्छ आणि सुरक्षित पर्याय आहे. माठातील पाणी मातीतील सूक्ष्म खनिजांसह तुमच्या शरीराचे नैसर्गिकरित्या पोषण करते त्याचप्रमाणे उष्माघाताचा धोकाही कमी करते. नकआपल्या संस्कृतीचीही जपणूक होते.

## पाककला

### अचारी मिर्च फ्राय

**साहित्य :** ७, ८ मोठ्या आकाराच्या मिरच्या, २,३ हिरवी मिर्चा, १ सर्व्हिंग स्पून मोहरीचे तेल, चिमूटभर हिंग, २ चमचे आजवाईन, जिरे, कलोंजी, मेथी, सौफ आणि मोहरी आदी असलेला पंच मसाला, १/२ , १/२ टिस्पून हळद आणि धनेपूड, मीठ, १ चमचा कोणतेही लोणचे,

**कृती :** प्रथम मोठ्या आकाराच्या मिरच्या स्वच्छ करा आणि धुवा नंतर मधोमध कापून घ्या किंवा दोन भाग करा. नंतर तळण्याचे पॅन गरम करा आणि एक सर्व्हिंग स्पून मोहरीचे तेल घाला आणि नंतर त्यात चिमूटभर हिंग आणि पंच मसाला घाला तडतडल्यावर त्यात दोन चिरलेल्या मिरच्या आणि हळद आणि धनेपूड, मीठ घाला. मग एक चमचा कोणतेही लोणचे घालून चांगले मिक्स करा. त्यानंतर त्यात चिरलेली मिरची टाका आणि नीट ढवळून झाल्यावर पॅनचे झाकण झाकून बंद करुन ठेवा. तीन मिनिटांनंतर ते ढवळून पुन्हा चार मिनिटे शिजवावे.

## वास्तू

### स्टोअररुम संबंधी

❊ आपण घरातील सर्व अतिरिक्त वस्तू स्टोअररुममध्ये ठेवतो. ईशान्य कोपरा वगळता, नवीन घराच्या कोणत्याही दिशेने स्टोअर रुम करू शकता.

❊ पाहुण्यांच्या खोलीमध्ये आरसे ठेवू नये. त्याचप्रमाणे खोलीमध्ये अल्हाददायक सजावट केलेली असावी.

## सल्ला

टाइल्सवर काळे डाग असतील तर पाण्यात ब्लीच मिसळून ते टाइल्सवर लावा आणि थोडा वेळ तसेच राहू द्या, नंतर पाण्याने चांगले धुवा. डाग नाहीसे होतील.

## सौंदर्य

कोरफड वेरा जेल लावल्याने त्वचेला आर्द्रता मिळते.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५

**वरूथिनी एकादशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, शततारा १०।४९, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आजच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा सहयोग घ्याल.

**वृषभ :** दिवस अनुकूल व महत्वाचा असेल. आपले अडकेलेले कार्ये पूर्ण होतील. आनंदाची बातमी मिळेल.

**मिथुन :** महत्वपूर्ण व्यक्तींशी संपर्क अल्हाददायक राहतील. राजकीय व्यक्तींसाठी देखील स्थिती सुखदायक राहील.

**कर्क :** आरोग्य उत्तम राहील. नोकरदार व्यक्तींसाठी वातावरण अनुकूल राहील. कामात व्यस्तता अधिक व्यस्त राहाल.

**सिंह :** शत्रूवर्ग निष्प्रभावी राहील. श्रम अधिक झाल्यामुळे दमल्यासारखे वाटेल. आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील.

**कन्या :** प्रेयसीशी संपर्क होण्याची शक्यता आहे. मनोरंजनावर खर्च होईल. आरोग्य उत्तम राहील. कामासाठी प्रवासाचे योग संभवतात.

**तूळ :** वैवाहिक जीवनाच्या आनंदात वाढ होईल. लेखन कार्यात यश मिळेल. आरोग्यविषयक समस्या कमी होतील.

**वृश्चिक :** सहजरित्या नवीन आव्हाने पेलता. गृहिणी वर्गास उत्तम खरेदीचा योग आहे. कॉलेजियन्स्ला पॉकेटमनी मिळेल.

**धनु :** उल्हासाचा अनुभव येईल. जिभेला सुखावणारा दिवस असेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल.

**मकर :** कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. महत्वपूर्ण प्रश्नांचे निराकरण होईल. विधायक कामासाठी चांगला दिवस आहे.

**कुंभ :** मनोरंजनावर खर्च होईल. आरोग्य उत्तम राहील. मुले त्रास देऊ शकतात. हितशत्रूंवर मात कराल.

**मीन :** एखाद्या ओळखीच्या व्यक्तीबरोबर आपले सामंजस्य वाढेल. स्पर्धेमध्ये सहभागी होण्याचे योग आहेत.

**संकलक : अॅड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!


मतदान अधिकारी : काय झाल?
मतदार : रात्री कुणी पाजली त्याचं नावच आठवत नाहीये...!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ १०० कसोटीमध्ये सर्वात जास्त विकेट घेणारा पहिला भारतीय यष्टीरक्षक कोण? – ऋषभ पंत

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१६२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) सतत; निरंतर : नित्य ४) पिकांवर पडणारा एक रोग ७) प्रतिबंध; निषिद्ध ८) भास्कर; रवि; सूर्य १०) विधी; नियम; लॉ १२) एक जंगली प्राणी; रानरेडा १३) सत्त्वयुक्त; सकस १५) पंख; दुसरा १७) श्रीरामाच्या वानरसेनेतील दोन प्रमुख वानरांपैकी एक १८) झाडावर पिकलेले फळ १९) जंगल संपत्ती २१) एक इमारतोपयोगी लाकूड व त्याचे झाड २३) दहावी तिथी २५) रावणाची पत्नी २७) वाईट सवय; खोड २८) पगार; पेमेंट

**उभे शब्द :-** १) अमुक; फलाणा २) गणपतीचे एक नाव ३) भाकरी, पोळी वगैरे ज्यावर भाजतात ते पात्र ४) सोललेल्या उसाचा तुकडा ५) एक प्रकारची दारू ६) तेजस्वी : सतेज ९) साठ हजार पुत्र असलेला पुराणातील एक राजा ११) समर्थ रामदासांची पुण्यतिथी या नावाने ओळखली जाते १४) कक्ष; विभाग; शोरूम १५) प्रतिध्वनी १६) पाणथळ किंवा चिखलाची जमीन २०) धनवान; सधन २२) रंक; दीन २४) शे शंभर २६) पहिलीच समसंख्या

### शब्दगंध क्र. ७१६१ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : अॅड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** मोगऱ्याचे फूल कुठेही ठेवले तरी सुगंध हा येतोच तसेच आपुलकीची माणसे कुठेही असली तरी आठवण येतेच.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### सोशल मीडियावर ट्रेंड होत असलेले 'घिब्ली' नेमकं काय?

ChatGPTच्या या फीचरने लोकांना अक्षरक्ष: वेड लावले आहे. हे फीचर सध्या इंटरनेटवर सर्वात ट्रेंडिंग फीचर आहे. स्टुडिओ घिब्ली (Studio Ghibli) सारख्या इमेज तयार करण्यासाठी हे नवीन वैशिष्ट्यपूर्ण फीचर आहे. या फीचरचा वापर करत यूजर्सने सोशल मीडियावर वेगवेगळ्या प्रकारचे फोटो शेअर करायला सुरुवात केली आहे, ज्यांना लोक खूप पसंत करत आहेत. स्टुडिओ घिब्ली (Studio Ghibli) हे एक इमेज जनरेशन टूल आहे. चॅटजीपीटीच्या या वैशिष्ट्याद्वारे, यूजर्स त्यांचा कोणताही आवडता फोटो, चित्रपटातील फोटो किंवा कोणत्याही लोकप्रिय मीमला स्टुडिओ घिब्लीच्या (Studio Ghibli) फोटोमध्ये रूपांतरित करू शकतात. आपण देखील ही घिब्ली (Ghibli) इमेज कशी तयार करू शकता आणि स्टुडिओ घिब्ली (Studio Ghibli) म्हणजे काय? हे जाणून घेऊ.

ChatGPTचे हे नवीन वैशिष्ट्य फक्त तेच वापरू शकतात ज्यांच्याकडे ChatGPT Plus आहे. जे GPT-4 Turbo वर काम करते आणि DLL-E द्वारे अशा इमेज तयार करू शकतात. किंबहुना, जर एखाद्या नवीन यूजर्स हा I इमेज जनरेटर वापरायचा असेल, तर या सुविधेचा लाभ घेण्यासाठी त्याला दरमहा २० (अंदाजे रु. १,७१२) द्यावे लागतील. ChatGPT मध्ये स्टुडिओ घिब्ली सारखी इमेज तयार करण्यासाठी, "Can you turn this into a Ghibli style photo?', "Show me in Studio Ghibli style.', "How would Ghibli sketch my features?' असे प्रॉम्प्ट वापरू शकता.

या नवीन एआय टूलद्वारे घिब्ली इमेज तयार करणे हे अतिशय सोपे आहे. हे नवीन फीचर वापरण्यासाठी तुम्हाला चॅटजीपीटीमधील इमेज क्रिएटर ऑप्शनवर जावे लागेल. त्यानंतर चॅटजीपीटीमध्ये Can you turn this into a Ghibli style photo?', "Show me in Studio Ghibli style.', "How would Ghibli sketch my features?' असे प्रॉम्प्ट वापरू शकता. तुम्हाला घिब्ली-स्टाईलमध्ये हवा असलेला कोणताही फोटो निवडा -GPT-40 _m°So>bbm Make a Studio Ghibli version of this image असं प्रॉम्प्ट द्या. तुमची घिब्ली-स्टाईल इमेज तयार होईल.

आता तो फोटो सोशल मीडियावर शेअर करा आणि या ट्रेंडचा भाग व्हा. Studio Ghibli हा जपानी ॲनिमेशन स्टुडिओ आहे. Ghibli nimation Studio ची स्थापना १९८५ मध्ये Hayao Miyazaki, Isao Taka आणि Toshio Suzuki यांनी केली होती. Ghibli Art भावनिकरित्या तयार केलेल्या स्टोरी लाइन आणि हाताने काढलेल्या निमेशन कैरेक्टर संदर्भ देते.

## बढाईखोर कोल्हा

एकदा कोल्हा आणि बोका गप्पा मारत बसले होते. कोल्हा म्हणाला, 'बोकोबा, कदाचित येथे आपणावर जर एखादे संकट आले, तर हजार युक्ती योजून मी त्यातून निभावून जाईन, पण तुझे कसे होईल, याबद्दल मला मोठी काळजी वाटते.'

बोका म्हणाला, 'गड्या, मला फक्त एकच युक्ती ठाऊक आहे, तेवढी चुकली तर मात्र माझी धडगत नाही.'

कोल्हा म्हणाला, 'तर बाबा, तुझी चिंता मला फार वाटते, अरे बापड्या, तुला एक – दोन युक्ती मी तरी शिकवल्या असत्या; पण आजचा काळ असा हे की ज्याने त्याने आपल्या स्वतःपुरते पहावे, दुसऱ्याच्या उठाठेवी करू नयेत. बरे तर आता रामराम ! आम्ही येतो.'

इतके बोलून कोल्हा निघाला, तो मागून हा हा म्हणता पारध्याचे कुत्रे धावत आले. बोक्यास झाडावर चढता येत होते, त्यामुळे त्याने आपला जीव वाचविला. पण कोल्ह्याच्या हजार युक्त्यांपैकी एकही युक्ती त्याच्या उपयोगी पडली नाही. तो घाबरून चार पाच पावले धावत होता आणि तेवढ्यात कुत्र्यांनी त्याला धरले.

तात्पर्य: दुसऱ्यापेक्षा मी अधिक शहाणा, अशी बढाई मारण्याला त्याचे शहाणपण वेळेवर उपयोगी पडत नाही; पण ज्याला तो कमी शहणा समजतो त्याचेच शहाणपण शेवटी उपयोगी पडते.

## रहमते दर्शन (भाग – १)



मुझे संत दर्शनसिंह जी महाराज से नामदान की अमूल्य दात प्राप्त हुई। मेरे परिवार में मेरा सबसे छोटा लड़का ही बचा था, जिसे अभी नामदान नहीं मिला था, परन्तु वह अपने गले में महाराज जी का लॉकेट अवश्य बाँधे रखता था । वह कटेवड़ा गाँव में बाहरवीं कक्षा में पढ़ता था। एक बार की बात है कि उसकी एक ट्रैक्टर से दुर्घटना हो गई। इस दुर्घटना में पूरा ट्रैक्टर और ट्रॉली उसके ऊपर से गुज़र गये। वहाँ मौजूद किसी भी व्यक्ति को उसके बचने की उम्मीद नहीं थी, परन्तु वह लड़का बिल्कुल सही सलामत घर पहुँच गया, उसे खरोंच तक नहीं आई।

हमारा एक पड़ौसी हमसे बहुत जलता था, हर वक़्त कोई न कोई झगड़ा करता ही रहता । एक दिन उन लोगों ने हमारे घर पर पत्थर बरसाने शुरू कर दिये। वे संख्या में ज़्यादा थे। हम अपने घर में छिप गये। जब पत्थरों की वर्षा बंद हुई, तो लोगों ने

### हमारे रक्षक

बताया कि वे लोग तुम्हारे घर पर जो पत्थर मार रहे थे, वे पत्थर वापिस आकर उन्हें ही लगते थे। इसका परिणाम यह हुआ कि वे सारे के सारे लहू-लुहान हो गये और हमें कुछ भी नहीं हुआ । इस प्रकार महाराज जी ने पल-पल हमारी रक्षा की है और अब भी वे हमारे संग हमेशा रहते हैं।

### गुरु का प्यार

जब से मैंने होश संभाला तो पाया कि हमारा परिवार महाराज कृपालसिंह जी का नामलेवा था । मैं भी उनके संग सत्संग में जाती थी।

छोटी आयु में ही मुझे एक बार टाइफॉइड हो गया। काफी दिन तक आराम नहीं आया और मेरी आँतों से ख़ून बहने लगा। एक दिन दुःखी होकर मैंने संस्कारवश महाराज जी को पुकारा । मेरी चीत्कार सुनकर महाराज जी ने अस्पताल में मुझे दर्शन दिये। मेरे आँसू पोंछे और मुझसे बोले, चिंता न करो, तुम ठीक हो जाओगी, और मैं ठीक हो गई।

जब मैं बड़ी हुई, तो उस समय महाराज दर्शनसिंह जी गुरु गद्दी पर थे। मेरी शादी भी अब हो चुकी थी। कुछ दिन बाद मुझे बच्चा होने वाला था। प्रसव के लिए अस्पताल में दाख़िल हो गई । वहाँ मेरी हालत बिगड़ गई। कारण, मेरे पेट में दो बच्चे थे। डॉक्टरों ने कहा, कभी भी जान को ख़तरा हो सकता है, तुरन्त ऑपरेशन करना पड़ेगा। मैं घबरा गई। मैंने महाराज जी को याद किया क्योंकि मैं ऑपरेशन नहीं कराना चाहती थी। मुझे किसी से बात करते देखकर लेडी डॉक्टर आ गई और बोली, तुम किससे बात कर रही थीं? मैंने कहा, मैं अपने गुरु से बात कर रही थी । इसके बाद महाराज जी ने मुझे आश्वस्त किया कि चिंता की कोई बात नहीं है, सब ठीक होगा। थोड़ी ही देर में बिना किसी ऑपरेशन के दोनों बच्चे सकुशल पैदा हो गये। सब डॉक्टर और नर्सों हैरान थी ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग – २)

मन में आयेगा मै फेल होऊगां, इसे बदलो और सोचो मै पास होऊगां । मन में आयेगा मै सुस्त हूं उसे तुरंत बदलो और कहो मै चुस्त हूं चुस्त हूं। ऐसे जो भी नाकारात्मक विचार आता है। उसका उल्टा सकारात्मक विचार करो चाहे हालात कैसे भी हो। अपमान जब यह चक्र दूषित होता है तो अपमान की भावना बढ़ जाती है। वह बजुर्गों का अपमान, माता का अपमान, मासी का अपमान, बुआ का अपमान करता है। ऐसे लोग अपने से छोटों को बात बात पर डांटते हैं, उन्हे नीचा दिखाते हैं। उनको अपमानित करते है उनसे माफी मंगवाते हैं और लिख कर माफी मंगवाते हैं। ऐसे लोगो की एक और आदत होती है जब कोई बाहर का व्यक्ति घर आता है तो वह अपने से छोटों की उनके सामने गलतियां बतायेगी/बतायेगा। उन्हे हर तरह से उनके सामने अपमानित करते हैं। ऐसे लोगों को थोड़ा सा कुछ कह दो वह अपना अपमान समझते हैं। दूसरों के आगे रोते रहेंगे फलाने ने मेरा अपमान किया है। ऐसा व्यक्ति प्यार से वंचित है इस कारण से वह अपमान करता है। दूसरा उस में ज्ञान की कमी है। उन्हे मन से प्यार दो। दुनिया में जो बजुर्ग भाई वा

### स्वाधिष्ठान चक्र

मातायें हैं जिनसे कोई लेना देना नहीं है उन्हे मन से प्यार की तरंगे देनी चाहिये। उनका मन में सम्मान करें। मन में उनकी आरती उतारा करो। धीरे धीरे जो आप के आस पास के लोग है आप उनका भी अपमान नहीं करेगें आप को उनके प्रति प्यार पैदा होगा और आप खुश रहने लगेगें। मीठे बोल – जब स्वाधिष्टान चक्र जागृत हो जाता है, उस व्यक्ति के बोल सुनते ही मन में चैन आ जाती है। दिल करता है उन्हें ही सुनते रहें। वह विपरीत हालात में भी कटु वचन नहीं बोलता । दादी प्रकाशमनी के बोलो में कितनी कशिश थी। उन से बार बार मिलने को मन आतुर हो उठता था। मीठे बोलो से लाखों दिलों पर उन्होने राज किया। सुरीली आवाज हर किसी को अपनी ओर आकर्षित करती है। जितना भगवान को याद करेगें तथा सभी के प्रति मन में प्यार रखते हैं उतना ही आप की जबान रस आ जायेगा।

दयालुता – इस चक्र के शुद्ध होने पर मनुष में दयालुता का गुण आ जाता है। वह महात्मा बुद्ध की तरह हर जीव जन्तुओं और खूंखार डाकुओं को भी माफ कर देता है। मदर तेरेसा की तरह बेसहारा लोगो के जीवन में खुशहाली लाने लगता है।

दयालुता का स्त्रोत आप के अन्दर गहराई में इस चक्र में है। दयालुता अर्थात अपने दिल की गहराई में दूसरो का ध्यान रखना उनके कल्याण का सोचना। दयालुता अर्थात बदले में कुछ न चाहना कोई उम्मीद न रखना। सिर्फ दूसरों को खुश करना दयालुता नहीं। उनके मन में बल भरना ही दयालुता है। अपने विचारो में चलने वाली बातचीत पर नजर रखना और अपनी नकारात्मक सोच रोकना ही दयालुता है।

अहिंसा – इस चक्र में शुद्धि होने पर व्यक्ति में अहिंसा का भाव बढ़ जाता है। वह मन वचन व कर्म से किसी का भी नुकसान नहीं करता है। विरोधी व्यक्तियों को भी गले लगाता है। सारे संसार को अपना घर समझता है। इस चक्र के समर्थ होने पर सदा विकास के कार्य करता है। उस में स्फूर्ति और उत्साह बना रहता है। उसकी सोच महीन और सर्वोत्तम होती है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदीय बालसंस्कार

खेळण्यामुळे बाळांचा व्यायाम आपोआप होतो व त्यामुळे त्यांची शारीरिक शक्ती वाढते. ही शक्ती वाढल्याने बाळ अधिक खेळकर होते, म्हणून बाळाच्या विकासामध्ये आहाराइतकेच झोपेला व खेळाला महत्त्व आहे. लहान बालकांना खेळण्यासाठी मोकळ्या हवेमध्ये, तसेच बागेमध्ये फिरायला घेऊन जावे. एकाच ठिकाणी सारखे घरामध्ये बालक कंटाळते. त्याकरिता बालक सात-आठ महिन्यांचे झाल्यावर जेव्हा ते बाहेरच्या वातावरणातील गोष्टींचा आनंद घेऊ लागते, त्यावेळी त्याला बाबागाडीतून फिरायला न्यावे. फिरायला नेल्यावर बालकाला ताजी, मोकळी, स्वच्छ हवा मिळते. नवीन नवीन दृश्ये बघायला मिळतात व त्यामुळे बालक आनंदी राहते. तसेच बालकाला मोकळ्या हवेत नेल्यामुळे बाहेरच्या वातावरणाची त्याला हळूहळू सवय होते व बाहेरच्या वातावरणाशी जुळवून घेण्यासाठी त्याचे शरीर प्रयत्न करू लागते. आरोग्याला हानिकारक अशा धूर, धूळ, डास, माश्या,

### प्रसूतीनंतर करावयाचे बालसंस्कार

अतिगोंगाट असलेल्या ठिकाणी बाळाला फिरायला घेऊन जाऊ नये. स्वच्छ हवा, उजेड, मोकळी हवा असलेल्या ठिकाणी, तसेच बागेमध्ये प्रसन्न वातावरणात, मंदिरात बालकाला घेऊन जावे. मुलांची खेळणी ही धारदार, टोकदार व खूप जड नसावीत. मुलांच्या नाका-तोंडामध्ये खेळणी सहज जाऊ शकतील अशा आकाराची नसावीत. उदा. पैशांचे नाणे, गोट्या इत्यादी. मुलांना खेळणी खेळायला देताना ती निर्जंतुक पाण्याने (डेटॉलने) धुऊन घ्यावीत व पुसून कोरडी करून खेळण्यास द्यावीत.

हे सर्व प्रयोग करताना मुलांना प्रेमाने, आनंदाने समजावून सांगून करावे. यामध्ये अघोरी मारणे, चिडचिड करणे, रागावून शिकवणे, धाक लावणे असे प्रयोग करू नयेत. अशा प्रकारे योग्य असा सकस आहार, त्यासोबत एखादा मैदानी खेळ व दैनंदिन अभ्यासाची सवय व विरंगुळा म्हणून एखादा छंद या सर्व गोष्टींमधून मुलांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास निश्चितच चांगल्या प्रकारे करू शकतो.

आतापर्यंत १५ वर्षांमध्ये आम्ही घेतलेल्या अनुभवावरून हे सिद्ध करू शकतो की, गर्भसंस्कार व त्यानंतर केलेले बालसंस्कार हे निश्चितच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी खूप उपयोगी ठरतात. याचे उदाहरण द्यायचे असेल तर पहिल्या बालकावर जर गर्भसंस्कार झाले नसतील तर व दुसऱ्या बालकाचे वेळेस जर गर्भसंस्कार केले तर दुसरे बाळ हे पहिल्या बाळापेक्षा नक्कीच जास्त हुशार तेजस्वी, बुद्धिमान व आरोग्यपूर्ण असते असे अनेक रुग्ण आम्हाला वारंवार सांगतात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# लष्कराच्या हद्दीमधील विविध नागरी समस्या तसेच बेलेश्वर, खोपेश्वर मंदिर विकासाचा प्रश्न मार्गी लागणार

**खा. निलेश लंके यांची माहिती; लष्करी अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेत दिल्या महत्वाच्या सूचना**

नगर – लष्कराच्या हद्दीतील विविध नागरी समस्या तसेच बेलेश्वर व खोपेश्वर मंदिराच्या विकासासंदर्भात खा.निलेश लंके यांच्या अध्यक्षतेखाली स्टेशन हेडक्वार्टर येथे बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात येऊन खा. लंके यांनी अधिकाऱ्यांना त्वरीत कारवाईचे निर्देश दिले.

लष्करी हद्दीतील बांधकामासाठीच्या ना हरकत प्रमाणपत्रासंदर्भात १० मिटर मर्यादेसाठी तातडीने रक्षा मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना खा. लंके यांनी दिल्या. वाकोडी, दरेवाडी, निंबोडी या गावातील नागरिकांना घरबांधणीसाठी लागणाऱ्या ना हरकत प्रमाणपत्रासंदर्भात रक्षा मंत्रालयाच्या सन २०११ व २०१६ च्या मार्गदर्शक सुचनांचा आधार घेत १०० ऐवजी १० मिटर मर्यादेस परवानगी मिळावी यासाठी स्पष्टीकरण मागविण्यासंदर्भात प्रस्ताव पाठविण्याच्या सुचना खा. लंके यांनी दिल्या असून या निर्णयामुळे अनेक गरजू नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

नगर येथील बेलेश्वर व विळद येथील खोपेश्वर मंदिरासाठी सुशोभिकरण व वीज पुरवठ्यासंदर्भातील प्रस्तावास लष्करी प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून सीमारेषा निश्चित करून अधिकृत



लष्करी हद्दीतील विविध समस्या दूर करण्यासाठी लष्करी अधिकाऱ्यांसमवेत आयोजित बैठकीत खा. निलेश लंके.

परवानगी घेण्यासंदर्भात खा. लंके यांनी या बैठकीत सुतोवाच केले.

नगर क्लब समोरील रस्त्याच्या दुरूस्तीसाठी या बैठकीत परवानगी देण्यात आली. या रस्त्यासाठी १५ लाख रूपयांचा निधी देण्याची ग्वाही खा. लंके यांनी दिली असून हे काम लवकरच सुरू होणार आहे.

या बैठकीस स्टेशन कमांडर ब्रिगेडियर रिझोल डिसोझा, अ‍ॅडमिन कमांडर समीर सरदाना, स्टेशन स्टॉक ऑफिसर ले. कर्नल माने, स्टाफ ऑफिसर ले. कर्नल संजय दिक्षीत, भिंगार कॅन्टोन्मेंटचे मुख्याधिकारी विक्रांत मोरे व इतर लष्करी अधिकारी उपस्थित होते.

अधिकाऱ्यांव्यतिरिक्त सीए अशोक पितळे, माजी नगरसेवक मुदस्सर शेख, गणेश तोडमल, सचिन कराळे, प्रवीण वारूळे, गणेश रोडे, अ‍ॅड. विनोद गवळी यांच्यासह वाकोडी, दरेवाडी, निंबोडीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

### जिवंत बॉम्ब तातडीने निकामी करा

गेल्या आठवडयात राहुरी कृषि विद्यापीठाच्या परिसरात फायटर जेटमधून पडलेला जिवंत बॉम्ब जमिनीमध्ये सुमारे सात फुट खोलवर अडकलेला आहे. तो नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणारा असल्याने तो तातडीने निकामी करण्याच्या सुचना खा. लंके यांनी दिल्या.

### शैक्षणिक व अत्यावश्यक गरजांसाठी रस्ते खुले करा

लष्करी हद्दीतील अनेक रस्ते पूर्वी नागरीकांसाठी खुले होते. मात्र अलिकडच्या काळात हे रस्ते बंद करण्यात आले आहेत. रस्ते बंद करण्यात आल्याने शाळकरी मुलांना त्रास सहन करावा लागतो. हे रस्ते किमान शैक्षणिक व अत्यावश्यक गरजांसाठी खुले करावेत अशी मागणी खा. लंके यांनी यावेळी केली. दरेवाडी, हरीमळा रस्ता ग्रामपंचायतीच्या हद्दीत असून तो नागरिकांसाठी खुला करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

# अहिल्यानगर शहरातील दिव्यांगांना संजय गांधी योजनेचा लाभ मिळणार

**खा.निलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश**



नगर – नगर महानगरपालिकेच्या वतीने दिव्यांग बांधवांसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या ५ टक्के निधीतून दिव्यांगांना देण्यात येणारा लाभ हे मासिक वेतन नसल्याने या दिव्यांगांना संजय गांधी निराधार योजनेचाही लाभ घेता येईल असे महानगरपालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. यासंदर्भात खा. निलेश लंके यांनी महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे पाठपुरवा केला होता.

महानगरपालिकेकडून देण्यात येणारा ५ टक्के राखीव निधीचा लाभ घेणाऱ्या दिव्यांगांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देता येणार नाही अशी भूमिका महसूल विभागाने घेतल्यानंतर निलेश लंके अपंग कल्याणकारी संस्थेचे प्रमुख सुनील करंजुले यांनी यासंदर्भात खा. निलेश लंके यांचे लक्ष वेधले होते.

महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग, अपंगांना केंद्र शासनाच्या हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात दारिद्र्य, निर्मुलन, उपकरणे खरेदी तसेच वैयक्तिक लाभासाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्याची तरतुद आहे. महसूल विभागने दिव्यांगाना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ नाकारल्यानंतर खा. लंके यांनी यासंदर्भात पत्रव्यवहार करून ५ टक्के राखीव निधीचा लाभ कुठल्याही प्रकारचा नियमित मासिक आर्थिक लाभ नसून तो केवळ अपंग, दिव्यांगांच्या वैयक्तिक लाभासाठी व उपकरणे खरेदीसाठी, दारिद्र्य निर्मुलनासाठी देण्यात येत असल्याने संजय गांधी निराधार योजनेचा लाभ दिव्यांगाना मिळाला पाहिजे अशी भूमिका खा. लंके यांनी मांडली.

खा. लंके यांनी यासंदर्भात मागणी केल्यानंतर महानगरपालिकेच्या आयुक्तांनीही दिव्यांगांना नियमित मासिक आर्थिक लाभ मिळत नसल्याचे पत्र महसूल विभागाला दिले. त्यानंतर आता दिव्यांगांच्या संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने शिक्षिका नाजेमा शेख यांना संघशक्ती नारी शक्ती पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# ‘उर्दू’च्या शिक्षिका नाजेमा शेख यांना संघशक्ती ‘नारी शक्ती पुरस्कार’ प्रदान

नगर – महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने नेवासा तालुक्यातील सोनई येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा सोनई नंबर ४ च्या शिक्षिका नाजेमा बेगम नवाब शेख यांना नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कवी अशोक नायगावकर यांच्या उपस्थितीत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांच्या अध्यक्षतेखाली नगर येथे हा सोहळा पार पडला.

याप्रसंगी रावसाहेब रोहकले, आबासाहेब जगताप, रावसाहेब सुंबे, सुरेश निवडुंगे, प्रवीण ठुबे, शिक्षक बँकेचे चेअरमन बाळासाहेब सरोदे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष जयश्रीताई झरेकर, संगीता कुरकुटे, उज्वला वासाल, स्वाती गोरे आदी उपस्थित होते.

नाजेमा शेख म्हणाल्या की कामाचे कौतुक झाल्यावर अजून जोमाने काम करायला बळ मिळते. काम करताना समाजातून सहकार्य मिळाल्यास भविष्यात पण विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविण्याची त्यांनी इच्छा व्यक्त केली.

# निंबळक, इसळक, खारेकर्जुने ही गावे नेप्ती महसूल मंडलला जोडण्याची मागणी

**आ. काशिनाथ दाते यांना निवेदन**

नगर – निंबळक, इसळक, खारेकर्जुने ही गावे सध्या नागापुर महसूल मंडलात समाविष्ट आहेत. या भागातील पर्जन्यमापक नागापुर सीना परिसरात आहे त्यामुळे तेथे पर्जन्यमान जास्त दर्शविले जाते. परंतु वास्तवात मात्र ही गावे कमी पावसाची आहेत. याचा फटका शेतकरी वर्गाला विविध शासकीय योजना घेताना बसतो. चूकीची आणेवारी आल्याने शेतकरी वंचित राहतो.



निंबळक, इसळक, खारेकर्जुने ही गावे नेप्ती महसूल मंडलला जोडावी या मागणीचे निवेदन आ. काशिनाथ दाते यांना देताना ग्रामस्थ.

तसेच या मंडलात येणारी इतर गावे उदा. विळद, देहरे, नांदगाव, शिंगवे नाईक बागायत क्षेत्राची आहेत ते या शहरी मंडलात येतात. निंबळक, इसळक, खारेकर्जुने ही गावे जिरायत क्षेत्राची असून खारेकर्जुने ह्या गावाचे भारत सरकारचे संरक्षण खात्याकडे मोठ्या प्रमाणात क्षेत्र असून सदर क्षेत्र हे पडीक व नापिक आहे. या तिनही गावातील शेतकरी वर्गाला पीक विमा, खराब हवामान, इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये मिळणाऱ्या सुविधा, शेती कर्जाचे पुनर्गठन, कृषि विभागाच्या सुविधा आदि पासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात वर्षानुवर्ष अन्याय होत आहे. या शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी नव्याने झालेल्या नेप्ती मंडलात समावेश करावा, तसेच ह्या परिसरात नविन पर्जन्यमापक बसवावा, अशा आशयाचे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी अंबादास शेळके, विलास कांडेकर, शरद बेकारसे, राहुल दरंदले, राम शेळके तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

मागील वर्षापासून या संदर्भात पाठपुरावा करत आहे. परंतु शासन दरबारी अनास्था आणि तत्कालीन जिल्हाधिकारी सालीमठ यांनी शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न गंभीरतेने घेतला नाही, असे माजी उपसभापती डॉ.दिलीप पवार यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या प्रश्नात जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांना न्याय मिळण्यासाठी महसूल मंडल बदल करण्यात यशस्वी प्रयत्न करू, असे आश्वासन आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.

# शिक्षण हे पायाभूत ध्येय समोर ठेवून स्व. माधवराव मुळे यांचे कार्य

**डॉ. सदानंद मोरे यांचे प्रतिपादन; शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवन गौरव पुरस्कार जी.डी. खानदेशे यांना प्रदान**

नगर – शिक्षण हे पायाभूत ध्येय समोर ठेवून मराठा बोर्डिंगची स्थापना केली गेली. सत्यशोधक समाज चळवळीत वाढलेले माधवराव मुळे यांनी या बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी बहुमोल योगदान दिले. त्यामुळे आज मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची यशस्वी वाटचाल सुरु असल्याची भावना साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केली.



स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्यावतीने शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवन गौरव पुरस्कार जी. डी. खानदेशे यांना प्रदान करण्यात आला.

स्व. माधवराव दगडूजी मुळे प्रतिष्ठानच्यावतीने शिक्षणमहर्षी माधवरावजी मुळे जीवन गौरव पुरस्कार जी. डी. खानदेशे यांना प्रदान करण्यात आला. खानदेशे यांच्या वतीने त्यांचा मुलगा अभय खानदेशे यांनी हा सन्मान स्वीकारला. यावेळी मोरे बोलत होते. लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश मुळे, उपाध्यक्ष दत्तापाटील नारळे, सचिव डॉ. मच्छिंद्रनाथ तांबे, प्रा. लालचंद हराळ, डॉ. महेश मुळे आदी उपस्थित होते.

पुढे डॉ. मोरे म्हणाले की, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेतून बहुजन समाज शिक्षणाच्या प्रवाहात आला. याच संस्थेतून अनेक आमदार, खासदार व विविध क्षेत्रातील दिग्गज व्यक्तीमत्व घडले आहेत. या संस्थेसाठी व शैक्षणिक चळवळीला गती देण्याचे काम करणाऱ्या जी. डी. खानदेशे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यासाठी योग्य व्यक्तीची निवड करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तर सर्व पुरस्कार्थींचे कार्य डॉक्युमेंटेशनच्या रूपाने सर्व समाजासमोर आणण्याची गरज त्यांनी बोलून दाखवली. हा लेखी स्वरुपातील ठेवा सर्वांसाठी प्रेरक ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. सर्जेराव निमसे म्हणाले की, जी. डी. खानदेशे प्रसिद्धीपासून लांब राहिलेले व्यक्तिमत्व आहे. माधवराव मुळे यांनी शिक्षणसंस्थेचा पाया घातला, तर जी. डी. खानदेशे यांनी त्या पायावर कलश चढविला. शैक्षणिक संस्थेच्या प्रत्येक बांधकामात त्यांनी विशेष लक्ष दिले. त्यांच्या सहकार्याने प्राचार्य असताना उत्तमपणे कार्य करता आल्याचे सांगून त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी प्रकाश झावरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

स्वागत दत्ता पाटील नारळे यांनी केले तर प्रास्ताविकात मुकेश मुळे यांनी प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती दिली. प्रकाश झावरे यांनी स्व. माधवराव मुळे यांच्या जीवनाविषयी व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान विषद केले. प्रसिद्धीपासून लांब राहिलेले आणि समाजासाठी योगदान दिलेले जी. डी. खानदेशे यांच्या जीवनावर गौरव ग्रंथ लवकरच प्रकाशित केला जाणार असल्याचे यावेळी सर्वानुमते जाहीर करण्यात आले.

अभय खानदेशे यांनी वडिलांच्या कार्याची दखल घेवून दिलेल्या पुरस्काराबद्दल खानदेशे परिवाराच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली व आभार मानले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रतिष्ठानची सहावी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पाडली. यावेळी समाजाच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विविध ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश भगत यांनी केले. आभार सचिव प्राचार्य डॉ. एम.एम. तांबे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महेश मुळे, नीलीम काळदाते, सुनील मस्के, बजरंग पाडळकर, संतोष आव्हाड, निलेश जासूद, दिनकर मुळे, संजय कोतकर व सर्व सभासद यांनी परिश्रम घेतले. यावेळी मुळे (आबा) यांच्यावर प्रेम करणारे सर्व स्नेही व नगरकर उपस्थित होते.



रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीच्या संचालकपदी निवडून आल्याबद्दल राजेंद्र कंत्रोड यांचा घर घर लंगर सेवेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीच्या संचालकपदी निवडून आल्याबद्दल राजेंद्र कंत्रोड यांचा सत्कार

नगर – श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत संचालकपदी निवडून आल्याबद्दल राजेंद्र कंत्रोड यांचा घर घर लंगर सेवेच्या वतीने सन्मान करण्यात आला. तारकपूर येथील लंगर सेवेच्या अन्न छत्रालयात साहित्यिक तथा कवी इंजी. देवेंद्रसिंह वधवा आणि घर घर लंगर सेवेचे जनक आहुजा यांनी राजेंद्र कंत्रोड यांचा सत्कार केला. याप्रसंगी मनिषाकौर वधवा, हरजितसिंह वधवा, प्रितपालसिंह धुप्पड, सतीश गंभीर, मुन्ना जग्गी, राजू जग्गी, गुलशन कंत्रोड, प्रशांत मुनोत, सोमनाथ चिंतामणी आदी उपस्थित होते.

देवेंद्रसिंह वधवा म्हणाले की, राजेंद्र कंत्रोड हे केवळ सहकार क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तीमत्व असून, सामाजिक क्षेत्रातही ते कायम सक्रिय असतात. गरीब व गरजूंना मदत करणे, लोकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांची कार्यशैली आहे. संचालक म्हणून त्यांच्या निवडीने संस्थेचा विकास वेगाने होईल, असा आमचा विश्वास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनक आहुजा म्हणाले की, आपल्या समाजात सामाजिक जाणीव असलेल्या व्यक्तींनी पुढे येणे ही काळाची गरज आहे. राजेंद्र कंत्रोड यांनी त्या जबाबदारीचे भान ठेवून काम करत आहे. त्यांच्या अभ्यासू व्यक्तीमत्वाचा संस्थेला व संचालक मंडळाला फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालय येथे जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्यात आला.

# के. जी. कला व महाविद्यालयात जागतिक वसुंधरा दिन साजरा


नगर – के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालय, अहिल्यानगर येथे २२ एप्रिल रोजी जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.स्वाती मुनोत यांनी प्रत्येक विद्यार्थ्याने पर्यावरण पूरक जीवनशैलीचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे असे सांगून प्लास्टिक विरहित परिसर, पाण्याचा जपून वापर करणे, हरित ऊर्जेचा होणारा उपयोग याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी सौ.अमृता मुळे यांनी जागतिक वसुंधरा दिना विषयी आपले मत विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सविता चव्हाण यांनी केले. प्रा. स्नेहल बोरावके यांनी आभार मानले.

वसुंधरा दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा व पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा.डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. डॉ.प्रशांत खोपटीकर, प्रा. आरती खेडकर, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते.

# आयएमएसच्या सिद्धी गांधी व दिव्या चौधरी यांचे ‘राष्ट्रीय परिषद विकसित भारत २०४७’ मध्ये यश

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज एमबीए १ च्या विद्यार्थिनी सिद्धी गांधी आणि दिव्या चौधरी यांनी विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय परिषदेतील व्यवस्थापन श्रेणीतील सर्वोत्तम पोस्टर सादरीकरणासाठी पुरस्कार प्राप्त केला आहे. ही परिषद बी.पी. आर्ट्स एस.एम.ए. सायन्स आणि के.के.सी. कॉमर्स कॉलेजच्या आणि के.बी.सी. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती. सिद्धी गांधी व दिव्या चौधरी या विद्यार्थिनींनी गो ग्रीन: विकसित भारतासाठी शाश्वत भविष्य या विषयावर संशोधनपत्र सादर केले. या यशस्वी सादरीकरणासाठी त्यांना रिसर्च प्रमुख डॉ. राहुल खंडेलवाल यांनी मार्गदर्शन केले. संचालक डॉ. विक्रम बार्नबस, एमबीए विभाग प्रमुख प्रा.प्रणोती तेलोरे, रिसर्च प्रमुख डॉ.राहुल खंडेलवाल आदींनी अभिनंदन केले.



आयएमएसच्या विद्यार्थिनी सिद्धी गांधी आणि दिव्या चौधरी यांनी विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय परिषदेतील व्यवस्थापन श्रेणीतील सर्वोत्तम पोस्टर सादरीकरणासाठी त्यांचा सत्कार करताना संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता.

हा अभ्यास शाश्वत कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरणीय संवर्धन यांना प्रोत्साहन देतो. तो व्यक्ती आणि समुदायांना उपभोग कमी करून, साहित्य पुन्हा वापरून, आणि उत्पादनांचे जीवनकाल वाढविण्यासाठी पुनर्नवीनीकरण करून कचरा कमी करण्यास प्रोत्साहित करतो. कचरा कमी करणे म्हणजे विचारपूर्वक उपभोग, एकवेळ वापरण्यायोग्य प्लास्टिक टाळणे, आणि शाश्वत पर्याय निवडणे. वस्तू पुन्हा वापरणे नवीन उत्पादनांची मागणी कमी करण्यात मदत करते, संसाधनांचे क्षय आणि प्रदूषण कमी करते. पुनर्नवीनीकरण कचऱ्याला नवीन साहित्यांमध्ये बदलते, ऊर्जा बचत करते आणि लँडफिलचा कचरा कमी करते. ही तीन–चरणांची पद्धत हवामान बदल, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन आणि परिभ्रमण अर्थव्यवस्था प्रोत्साहित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. दीर्घकालीन पर्यावरणीय शाश्वतता साध्य करण्यासाठी सरकार, व्यवसाय आणि व्यक्तींनी हे तत्त्व स्वीकारणे आणि अंमलात आणणे आवश्यक आहे. सार्वजनिक जागरूकता मोहीम, धोरणे आणि तांत्रिक प्रगती या पद्धतीची परिणामकारकता अधिक वाढवतात. कमी करा, पुन्हा वापरा, पुनर्नवीनीकरण करा हे रोजच्या जीवनात समाविष्ट करून, समाज आपले पर्यावरणीय ठसे लक्षणीयरीत्या कमी करू शकतो आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ, निरोगी ग्रहास योगदान देऊ शकतो. संस्था अशा प्रकारच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन देते ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास मदत होते असे प्रतिपादन डॉ. मेहता यांनी केले.

# जागतिक पुस्तक दिन


आज २३ एप्रिल, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गार्सीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचन संस्कृतीच्या चर्चे विना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही चला तर मग वाचन संस्कृती विषयी चर्चा करू आणि पुस्तक दिन साजरा करू.

आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे.

वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते.

वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.




# राजर्षी शाहू बालक मंदिर शाळेचे ‘मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत’ यश

## स्वरा कर्डिले जिल्ह्यात दहावी तर शिवन्या गायकवाड जिल्ह्यात तेरावी





नगर – केडगाव येथील राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे, राजर्षी शाहू बालक मंदिर शाळेतील विद्यार्थ्यांनी मंथन प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले. असून इयत्ता दुसरी मधील विद्यार्थिनी कु. स्वरा अशोक कर्डिले ही केंद्रात तिसरी व जिल्ह्यात दहावी तर कु. शिवण्या चंद्रकांत गायकवाड ही केंद्रात सहावी तर जिल्ह्यात तेरावी आली आहे.

संस्थेचे सचिव कोतकर सर, खजिनदार साठे सर, मुख्याध्यापिका रेणुका म्हस्के यांनी गुणवंत विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना मुग्धा जगदाळे, कविता भोर, सुजाता काकडे, सुवर्णा करांडे, योगिता काळे, अनिता उबाळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# ‘उपदेशक व सेंट जॉन द बॅप्टिस्ट चर्च गोंधवणी’तर्फे २७ एप्रिल रोजी ख्रिस्ती वधू वर मेळाव्याचे आयोजन

नगर – श्रीरामपूर तालुक्यातील गोंधवणी येथील सेंट जॉन द बॅप्टिस्ट चर्च व उपदेशक यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय ख्रिस्ती वधू वर परिचय मेळाव्याचे आयोजन २७ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत करण्यात आले आहे. इच्छुक वधू वरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

मेळाव्यात सर्व पंथीय ख्रिस्ती स्थळे पाहण्यास मिळतील तसेच विधुर, विधवा, घटस्फोटीत व इतर स्थळे पाहण्यास मिळतील. तरी ख्रिस्ती समाजातील वधू–वरांनी सदर मेळाव्यात सहभागी होण्याचे आवाहन आयोजन समितीचे अविनाश काळे व विक्रम गायकवाड यांनी केले आहे.

नाव नोंदणी व अधिक माहिती करिता ९८२३०१२८१७, ९०११० ११३९९, ८००७८३६१७४ यावर संपर्क साधावा.

# झहीर खान प्रमाणे क्रिकेटपटू समृद्धी शिंदे नगरचे नावलौकिक पूर्ण भारतात वाढवेल

### जयंत येलुलकर यांचे प्रतिपादन



अहिल्यानगरची समृद्धी शिंदे हिची महिला एम.पी.एल. क्रिकेट लीग स्पर्धेच्या पुणे वॉरियर्स संघात निवड झाल्याबद्दल तिचा सत्कार करताना जयंत येलुलकर व उद्योजक श्रीहरी टिपुगडे.

## अहिल्यानगरची समृद्धी शिंदे हिची महिला एम.पी.एल. क्रिकेट लीग स्पर्धेसाठी निवड

नगर – क्रिकेटपटू समृद्धी शिंदे हिला कुटुंबाने योग्य वयात प्रोत्साहन दिल्याने ती आज उत्कृष्ट क्रिकेटपटू झाली आहे. आपल्यातील कौशल्याला प्रोत्साहन मिळाले, गुणवत्तेला संधी मिळाली तर जीवन यशस्वी होऊन स्वप्न साकार होतात. यासाठी पालकांनी आपल्या मुलांना जास्तीत जास्त प्रोत्साहन देऊन मैदानी खेळाकडे वळवावे. आता महिलांना राज्य व राष्ट्रीयस्तरावर क्रिकेटमध्ये खूप मोठ्या संधी आहेत. पुरुषांप्रमाणे महिलाही क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. नगरची उभारती क्रिकेटपट समृद्धी शिंदे हिने भरपूर मेहनत घेऊन एम.पी.एल. सारखी मोठी स्पर्धा गाठली आहे. ती या स्पर्धेतही ती उत्कृष्ट कामगिरी करून भविष्यातही अनेक स्पर्धा यशस्वीपणे पादाक्रांत करून झहीर खान प्रमाणे समृद्धीही नगरचे नावलौकिक पूर्ण भारतात वाढवेल, असा विश्वास महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य जयंत येलुलकर यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगरची समृद्धी शिंदे हिची महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या पुणे वॉरियर्स संघात नुकतीच निवड झाली आहे. याबद्दल तिचा उज्वल हौसिंग सोसायटीच्या वतीने उद्योजक श्रीहरी टिपुगडे यांच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे जयंत येलुलकर बोलत होते. यावेळी धनंजय जाधव, माजी रणजीपटू व क्रिकेट प्रशिक्षक अनुपम संकलेचा, उद्योजक निनाद श्रीहरी टिपुगडे, समृद्धीचे आजोबा अनंत गारडे, वडील प्रवीण शिंदे व आई सुनीता शिंदे, ज्ञानसंपदा स्कूलच्या प्राचार्य शिवांजली अकोलकर आदी उपस्थित होते.

उद्योजक श्रीहरी टिपुगडे म्हणाले, क्रिकेटपटू समृद्धी शिंदे हिचा तिचा सराव मी रोज पहातो. ती गांभीर्याने व मेहनतीने क्रिकेटचा सराव करत आहे. त्यामुळे ती भविष्यात मोठी क्रिकेटपटू होणारच आहे. समृद्धी ज्ञानसंपदा शाळेची विद्यार्थिनी असल्याचा विशेष अभिमान आम्हाला आहे. समृद्धी शिंदेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत तिने भारतीय संघात स्थान मिळवावे अशा सदिच्छा.

धनंजय जाधव म्हणाले, सध्या आयपीएलमध्ये १४ वर्षाचा वैभव सूर्यवंशी उत्कृष्ट कामगिरी करत करत आहे. त्याच्या प्रमाणेच नगरची समृद्धी शिंदे ही एम.पी.एल. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत मैदान गाजवेल. समृद्धीच्या आई–वडिलांनी तिला योग्य प्रोत्साहन व मोकळीक दिल्याने ती आज यशस्वी खेळाडू होऊ शकली आहे.

यावेळी ज्ञानसंपदा शाळेच्या प्राचार्य शिवांजली अकोलकर, डॉ. हर्षवर्धन तन्वर आदींनी मनोगत व्यक्त केले. समृद्धीचे प्रशिक्षक अनुपम संकलेचा यांनी तिच्या दैनंदिन सरावाबद्दल माहिती दिली.

समृद्धी शिंदे ही आमच्या घरासमोरच रहाते. एकदा तिचा सराव चालू असताना तिचा लेदर बॉल माझ्या गाडीवर येऊन पडला. त्यामुळे गाडीला डेंटिंग झाले आहे. पण मी आजपर्यंत ते डेंटिंग काढले नाही कारण एका आदर्श खेळाडूने माझ्या गाडीला डेंटिंग केल्याची खूण मी कायम ठेवणार आहे, असे निनाद श्रीहरी टिपुगडे यांनी सांगून समृद्धीच्या खेळाचे कौतुक केले व सर्वांचे आभार मानले.

# वसुंधरा दिनानिमित्त मनपा ‘आराधना वसुंधरेची’ अभियान राबवणार; शनिवारी व रविवारी सीनानदी पात्रासह जलस्त्रोतांची स्वच्छता करणार

## नागरिक, सामाजिक संस्थांनी अभियानात सहभागी व्हावे : आयुक्त यशवंत डांगे

नगर – जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून राज्य शासनामार्फत १ मे पर्यंत आराधना वसुंधरेची हे अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातही शनिवारी व रविवारी शहरातील जलस्त्रोतांची साफसफाई करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. या अभियानात नागरिक व स्वयंसेवी, सामाजिक संस्थांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

शहरात २६ एप्रिल रोजी नागापूर पूल जवळ, व स्टेशन रस्त्यावरील पूल जवळ सीना नदी पात्र, लगतचा परिसर व रविवार २७ एप्रिल रोजी अहिल्यानगर–पुणे रस्त्यावर इलाक्षी शोरूम जवळ, कल्याण रोडवर असलेल्या पुला जवळील सीना नदी पात्र, लगतचा परिसर स्वच्छ करण्यात येणार आहे. यासह आठरे पाटील पब्लिक स्कूल येथील विहीर, बाळाजी बुवा विहीर येथे अभियान राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी व स्वयंसेवी, सामाजिक संस्थांनी यात सहभागी व्हावे, वसुंधरेचे जतन, हेच अहिल्यानगरचे वचन यानुसार वसुंधरेच्या रक्षणासाठी नागरिकांनीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे. स्वयंसेवक म्हणूनही सहभागी व्हावे व या कार्यात मदत करावी, त्यासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रमुख अशोक साबळे (मो.९५६१००४६५५) यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. आराधना वसुंधरेची या अभियानातून जलस्त्रोतांचे शुद्धीकरण होऊन पाण्याचा दर्जा सुधारेल. जलप्रदूषण कमी होऊन नागरिकांसह जलजीवन वाचेल. पाण्यातील जैवविविधता (मासे, जलवनस्पती) सुरक्षित राहतील व पर्यावरणाचा समतोल राखला जाईल, असे यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, रिड्यूस, रीयूज, रिसायकल या पर्यावरणपूरक तत्त्वांवर कार्य करणाऱ्या संस्थांचा १ मे रोजी सन्मान करण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जागृती निर्माण करणे. रिड्यूस, रीयूज, रिसायकल तत्वांचे पालन करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देणे, राज्य शासनाच्या योजनेसाठी निवडक उपक्रमांचा प्रातिनिधिक आदर्श निर्माण करणे, या उद्देशाने हा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच पर्यावरण बचाव, वसुंधरा सजाओ या संकल्पनेवर आधारित घोषवाक्य स्पर्धा घेण्यात येणार आहे. यात सहभागी होण्यासाठी अशोक साबळे यांच्याशी संपर्क साधावा. किंवा amc_anr@rediffmail.com या मेल आयडीवर ३० एप्रिलपर्यंत आपण बनवलेले घोषवाक्य पाठवावे त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यातून ३ सर्वोत्तम घोषवाक्यांची निवड केली जाणार आहे. या निवडलेल्या घोषवाक्यांचा वापर राज्य शासनाच्या जाहिरातीत केला जाणार आहे. तसेच, उत्कृष्ट घोषवाक्य देणाऱ्याचा स्वतंत्र सन्मान केला जाणार असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

# ६ ते १७ जून दरम्यान हिंदू धर्मातील सर्वोच्च, पवित्र असलेल्या आदी कैलास, मोठा कैलास आणि ॐ पर्वत यात्रा

नगर – हिंदू धर्मातील सर्वोच्च आणि पवित्र असलेल्या आदी कैलास, मोठा कैलास आणि ॐ पर्वत यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नंदकुमार पोळ यांनी दिली. सदर यात्रा ६ ते १७ जून दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.

’आदी कैलास’ हे भगवान शंकराचे निवासस्थान आहे. त्याला फार धार्मिक महत्व आहे. ही यात्रा फार पुरातन आहे. पांडवानी सुद्धा पापक्षालनासाठी यात्रा केली होती. आदी कैलास समुद्र सपाटीपासून १८००० फूट उंचीवर आहे. आता भारत सरकारने या परिसरात संपूर्ण रस्त्यांचे जाळे उभारले आहे. त्यामुळे ही यात्रा पूर्ण वाहनाने होते. कुठेही चालावे लागत नाही. भारतातील भगवान शंकरांची पहिलीच तीर्थ यात्रा आहे, जिथे चालावे लागत नाही. त्याचबरोबर या यात्रेत ’मोठा कैलासा’ च्या दर्शनाची सोय केली आहे. मोठा कैलास तिबेटमध्ये असल्याने चीन सरकारने या यात्रेवर बंधने आणल्यामुळे आता भारतातूनच एक व्ह्यू पॉईंट केल्याने मोठ्या कैलासाचे लांबून भारतातून दर्शन या यात्रेत होणार आहे.

कुठलाही पासपोर्ट विजा लागणार नाही. त्याच बरोबर ॐ आकारच्या पर्वताचे या यात्रेत दर्शन होणार आहे. या यात्रेत जगप्रसिद्ध नीम करोली बाबा, गोलू देवमंदिर, पाताळ भुवनेश्वर, जागेश्वर धाम, महर्षी व्यास गुफा, मुळ काली माता या मंदिराचे सुद्धा दर्शन होणार आहे. पूर्ण यात्रा अहिल्यानगर ते अहिल्यानगर आहे. ज्यांना या यात्रेला सहभागी व्हायचे असेल, त्यांनी अभिजीत पोळ मो. नं. ९४२२२२७९०६ आणि नंदकुमार पोळ मो. नं. ७८७५५०००५६.

# भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलाध्यक्षपदी सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांची निवड



नगर – भारतीय जनता पार्टी सावेडी मंडलाध्यक्षपदी सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांनी महाविद्यालयीन जीवनात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून सुरुवात करुन परिषदेच्या माध्यमातून सारडा महाविद्यालतून पुणे विद्यापीठावर विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड झाली होती.

सध्या ते अहिल्यानगर शहर भाजपमध्ये सचिव हे पद भूषवित आहेत. गेल्या २० वर्षांपासून चार्टर्ड अकाउंटंट म्हणून ते नगर शहरात कार्यरत आहेत. त्याचबरोबर २०२३–२०२४ मध्ये अहिल्यानगर सीए शाखेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. या कालावधीत नगर शाखेला अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळाले आहेत.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे प्रतिष्ठान, छत्रपती शाहू विकास प्रतिष्ठान, सावेडी याचे ते अध्यक्ष आहेत. २००५ साली त्यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित जाणता राजा महानाट्याचे आयोजन करण्यात आले होते. माजी नगरसेविका सौ. मनिषा बारस्कर–काळे या राजेंद्र गांधी यांच्या पत्नी आहेत.

# कुस्त्यांच्या जंगी आखाड्याने श्री वीरभद्र बिरोबा यात्रेची सांगता



नागापूर व नवनागापूर येथील श्री वीरभद्र बिरोबा यात्रेनिमित्त आयोजित कुस्त्यांच्या आखाड्यात रंगलेली कुस्ती.

नगर – नगर शहराजवळील नागापूर व नवनागापूर (ता.नगर) येथील ग्रामस्थाचे ग्रामदैवत श्री. वीरभद्र बिरोबा यात्रेची कुस्त्यांच्या जंगी आखाड्यानी सांगता झाली. या आखाड्यात जिल्हाभरातून कुस्तीगीर सहभागी झाले होते. चीतपट कुस्त्यांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

नागापूर येथे श्री विरभद्र बिरोबा देवस्थानच्या यात्रेचे सालाबादप्रमाणे दोन दिवस आयोजन करण्यात आले होते. २० एप्रिल रोजी मानाच्या काठीची भव्य अशी मिरवणूक काढण्या आली. यावेळी आकर्षक आतषबाजी करण्यात आली. २१ एप्रिल रोजी भव्य अशा कुस्त्यांच्या आखाड्याचे आयोजन करण्यात आले होते. भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डीले, दत्ता पाटील सप्रे, संजू भोर यांच्या हस्ते आखाडयाचे उद्घाटन करण्यात आले. पाचशे रुपयांपासून दहा हजार रुपये पर्यंतच्या कुस्त्या लावण्यात आल्या. आखाडा पाहण्यासाठी आलेल्या कुस्ती शौकीनांनी मल्लांवर बक्षिसाचा वर्षाव केला. यातील बहुतांश कुस्त्या काही क्षणातच चितपट झाल्या. शेवटच्या मानाच्या कुस्ती विजेत्याला चांदीची गदा देण्यात आली.

पंच म्हणून साहेबराव सप्रे व हनुमान कातोरे यांनी काम पाहिले. रात्री मनोरंजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रा उत्सवासाठी ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब भोर, रमेश सप्रे, कुंडलिक कातोरे, आजिनाथ सप्रे, सचिन भोर, आबा महाराज कातोरे, राहुल कातोरे, आकाश बारस्कर, भैरवनाथ भोर, भैय्या भोर, किशोर सप्रे, नवनाथ कातोरे यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमासाठी गावातील समस्त जेष्ठ मंडळींचे मार्गदर्शन व युवकांचा सक्रिय सहभाग लाभला. यात्रा कमिटीचे वतीने समस्त गावकरी व परिसरातील उद्योजकाचे आभार मानण्यात आले. या आखाड्यासाठी माजी नगरसेवक तसेच ग्रामपंचायत सदस्य सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# शासकीय मालमत्तेची चोरी प्रकरणी गुन्हा दाखल करा : ग्रामस्थांचे जिल्हा परिषदेत उपोषण



शासकीय मालमत्तेची चोरी प्रकरणी गुन्हा दाखल करा मागणीसाठी जि.प.मध्ये उपोषण करण्यात आले.

नगर – मौजे बांगार्डे (ता. श्रीगोंदा) येथील दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेचे लोखंडी पाईप चोरून नेल्याच्या प्रकरणात संबंधित आरोपीवर गुन्हे दाखल करुन आरोपींना पाठिशी घालणाऱ्या ग्रामसेवक व सरपंचांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी तक्रारदारांसह ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेत उपोषण केले. या उपोषणात माजी सरपंच घनश्याम शेळके, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विक्रम शेळके, बसपाचे सुनिल ओव्हळ, नितीन जावळे, अंबादास घोडके, विक्रम शेळके, राजू शिंदे, शहानवाज शेख आदींसह ग्रामस्थ सहभागी झाले होते. या आंदोलनास बहुजन समाज पार्टीच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.

मौजे बांगार्डे येथे तक्रारीनुसार, पाणीपुरवठा योजनेचे लोखंडी पाईप एका व्यक्तीने चोरून नेऊन स्वतःच्या गोठ्यात वापरले होते. याबाबत पंचायत समिती श्रीगोंदा यांच्या आदेशानुसार पंचनामा देखील करण्यात आला. यानंतर संबंधित आरोपी दिनकर शेळके याने सदर पाईप ग्रामपंचायतीकडे परत केले. मात्र शासकीय मालमत्तेची चोरी स्पष्ट असूनही अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

गटविकास अधिकारी व विस्तार अधिकारी पंचायत समिती यांनीही याप्रकरणी कारवाईसाठी सूचना व लेखी पत्रे दिली आहेत. तरी देखील गुन्हा दाखल होत नसल्याने संताप व्यक्त करण्यात आला आहे. अद्याप गुन्हा दाखल न झाल्याने ग्रामपंचायतीवर व ग्रामसेवकांवर पक्षपाती कारभार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे ग्रामसेवकांवर निलंबनाची कारवाई करून, शासकीय मालमत्ता चोरल्याबद्दल संबंधित व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत निंबळकच्या ओंकार खुंटाळे याचे यश




नगर – केंद्रीय लोकसेवा आयोगाने सन २०२४ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. त्यामध्ये नगर तालुक्यातील निंबळक येथील ओंकार राजेंद्र खुंटाळे याने यश मिळविले आहे. एकूण ११३२ पदांसाठी ही प्रक्रिया पार पडली. ओंकारने ६७३ वा क्रमांक मिळवत या परीक्षेत यश संपादन केले.

नगर तालुक्यातील देहरे सहकारी सेवा सोसायटीचे सचिव राजेंद्र खुंटाळे आणि निंबळक येथील अंगणवाडी सेविका मीनाक्षी खुंटाळे यांचा ओंकार हा मुलगा असून त्याला लहानपणापासून प्रशासकीय सेवेची आवड होती.

# गुजरातमधील जुळ्या बहिणींचा जुळा निकाल!

गुजरातमधील सुरत येथील जुळ्या रीबा आणि राहिन हाफेजी यांनी एमबीबीएस अंतिम परीक्षेत समान गुण मिळवले. दोघींनाही ६६.८ टक्के गुण मिळाले. या मुलींनी कोचिंगशिवाय नीट-यूजी उत्तीर्ण केले. राहिनला शस्त्रक्रियेची आवड आहे तर रीबाला औषधांमध्ये रस आहे. या २४ वर्षांच्या बहिणींचे शिक्षण आणि आयुष्याचे निर्णय नेहमीच सारखेच राहिले आहेत. त्याची आई गुलशाद बानू शिक्षक असून तिने दोघींनाही एकटीने वाढवले. या दोन बहिणींना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. पण त्यांनी ध्येय सोडले नाही. त्यांना कुटुंबातील पहिली डॉक्टर बनण्याचे होते. कोणत्याही खासगी क्लासशिवाय दोन्ही बहिणींनी नीट-यूजी वैद्यकीय प्रवेश परीक्षेत चांगली कामगिरी केली. रीबाला ९७ पर्सेंटाइल आणि राहीनला ९७.७ पर्सेंटाइल मिळाले.



**मेडिकल करण्याचा निर्णय**

राहिन म्हणते की, तिचे मामा डॉक्टर आहेत. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन तिने वैद्यकीय विषय शिकण्याचा निर्णय घेतला. लहानपणीही आम्हा दोघींना सारखेच गुण मिळायचे. त्या एकाच वसतिगृहाच्या खोलीत राहत होत्या आणि एकत्र लेक्चर अटेंड करत होत्या. रीबा म्हणते की, त्यांना जामनगर किंवा भावनगरच्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळू शकला असता. पण दोघींनाही एकत्र राहायचे होते, म्हणून त्यांनी २०१९ मध्ये जीएमईआरएस कॉलेज निवडले. ते सुरतजवळ आहे. अर्थात शहराबाहेर एकटे राहण्याची त्यांची ही पहिलीच वेळ होती. या बहिणी म्हणतात की, त्यांना आई आणि आजी-आजोबांकडून खूप पाठिंबा मिळाला आहे.

**स्वप्नपूर्तीचा आनंद**

राहिनने सांगितले की, आम्ही अनेक चढउतार पाहिले आहेत. पण आई आणि आजी-आजोबा नेहमीच आमच्यासोबत राहिले आहेत. त्याचे स्वप्न पूर्ण करू शकलो याचा आम्हाला आनंद आहे. राहिनच्या मते, सरकारी शिष्यवृत्ती आणि इतर आर्थिक मदतीमुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास फारशी अडचण आली नाही. प्रसूतीशास्त्र आणि स्त्रीरोगशास्त्रासारख्या शस्त्रक्रियेत मोठे शिक्षण घ्यायचे आहे, असे राहिन म्हणते तर रीबाला औषधांमध्ये रस आहे. पण दोघींनाही एकाच कॉलेजमधून पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे आहे.

# कॅलिडोस्कोप

# टार्गेट पूर्ण न केल्याने कर्मचाऱ्याला बनवले कुत्रा!

केरळमध्ये टार्गेट पूर्ण न केल्याने व्यवस्थापकाने कर्मचाऱ्याला कुत्र्यासारखे फिरवले! गळ्यात पट्टा घालून त्याला दोन पाय आणि हातावर चालायला लावले.

तुम्ही कामाला असाल तिथे पगारासह सन्मान देणे हे कंपनीचे कर्तव्य आहे. मात्र कंपन्यांचा क्रूर चेहरा समोर आल्यावर अनेक प्रकारचे प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होतात. महिन्याच्या पगारासाठी रात्रंदिवस मेहनत करून कंपनीला नव्या उंचीवर नेणाऱ्या कर्मचाऱ्याला मान नाही का? असे प्रश्न केरळमधील या उदाहरणावरून निर्माण होतात. आता कंपनीकडून कर्मचाऱ्याने कंपनीचे ठरवलेले टार्गेट पूर्ण केले नसल्याचा दावा केला जात आहे.

**पोलिसांची चौकशी सुरू**

टार्गेट पूर्ण न केल्याच्या रागातून या संबंधित व्यवस्थापकाने कर्मचाऱ्याला कुत्रा बनवले आणि त्याच्या गळ्यात पट्टा बांधून कार्यालयात फिरवले जात असल्याचा व्हिडीओ सौशल मीडियात फिरतो आहे. काम वेळेत न



पूर्ण केल्यामुळे त्याला अशी अपमानास्पद शिक्षा देण्यात आली आहे. पोलिसांचे म्हणणे आहे की कंपनीच्या माजी व्यवस्थापकाचा कंपनीच्या मालकाशी वाद झाला आणि त्यानंतर त्याने नवीन प्रशिक्षणार्थींसोबत असे वर्तन केले. हा कंपनीच्या प्रशिक्षणाचा एक भाग असल्याचा दावा केला जात आहे. आता असे वागणाऱ्या व्यवस्थापकाने कंपनी सोडली आहे.

**कारवाई सुरू**

कुत्र्याचा पेहराव केलेल्या कर्मचाऱ्यासोबत आणखी एक माणूस चालताना आणि सिट-अप करताना दिसत आहे. हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर केरळच्या कामगार विभागाने कामाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या कथित छळाच्या चौकशीचे आदेश दिले असून या प्रकरणाचा अहवाल मागवला आहे. या प्रकरणी पोलिसांनी माजी व्यवस्थापकाला जबाबदार धरले आहे.

# असा होतो क्षमतेचा गैरवापर

क्रेडिट कार्ड, ऑनलाईन व्यवहारांबाबतच्या गैरप्रकारांमध्ये, फसवणुकीमध्ये बरीच वाढ होते आहे. हा प्रकार फक्त भारतातच घडतो असं नाही तर जगभरातच ही समस्या आ वासून उभी आहे. मध्यंतरी जपानमध्ये अशीच एक घटना घडली. इथल्या एका मॉलमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने १३०० लोकांच्या क्रेडिट कार्डांचे नंबर लक्षात ठेऊन बरीच खरेदी केली. युसुके तानीगुची असं या कर्मचाऱ्याचं नाव आहे. त्याला क्रेडिट कार्डांची माहिती चोरून गैरप्रकार केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. तानिगुचीचा मेंदू खूपच तल्लख असल्यामुळे तो क्रेडिट कार्डांचे नंबर लक्षात ठेवत असे. इतकंच नाही तर वापरकर्त्यांचं नाव, कार्डांची अंतिम तारीख, सीव्हीसी क्रमांक त्याच्या लक्षात रहायचे. त्याने या क्षमतेचा वापर गैरप्रकार करण्यासाठी केला. या माहितीच्या आधारे त्याने ऑनलाईन खरेदी केली. अशाच एका खरेदीदरम्यान त्याची चोरी पकडली गेली. तानीगुचीच्या घरात एक वही सापडली असून त्यात बऱ्याच कार्डांचे नंबर आणि इतर माहिती आढळली. तानीगुचीने आपल्या बौद्धिक क्षमतेचा गैरवापर केल्याच्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर दिल्या जात आहेत.




# राजधानी बदलाचा इतिहास



बऱ्याच देशांनी विविध कारणांमुळे आपल्या राजधान्या बदलल्या आहेत. कोणे एके काळी कलकत्ता ही भारताची राजधानी होती. मात्र १९३१ मध्ये दिल्लीला राजधानीचा दर्जा देण्यात आला. भौगोलिकदृष्ट्या दिल्ली देशाच्या मध्यभागी असल्याने आणि विविध ठिकाणांहून दिल्लीला सहजपणे जाता येत असल्याने हा निर्णय घेण्यात आला. इंडोनेशियाही आपली राजधानी बदलण्याच्या तयारीत आहे. या देशाची सध्याची राजधानी जकार्ता भविष्यात पाण्याखाली जाणार आहे. ही प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे या शहरात वाहतुकीच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. हे लक्षात घेता हा देश बोर्नियो नामक बेटावर नवी राजधानी वसवण्याच्या तयारीत आहे. कझाकिस्तान या देशानेही आपली राजधानी बदलली. १९९१ मध्ये सोव्हियत युनियनपासून वेगळं झाल्यानंतर अलमातीला राजधानीचा दर्जा देण्यात आला. पण या शहराशी संबधित बऱ्याच समस्या होत्या. त्यातच हे शहर भूकंपप्रवण भागात येत असल्यामुळे अस्तानाला नवी राजधानी वसवण्यात आली. आता हे शहर नूर सुल्तान या नावाने ओळखलं जातं. एकेकाळी रंगून ही म्यानमारची राजधानी होती. मात्र २००५ मध्ये इथल्या लष्कराने देशाची राजधानी नैप्यीदाला नेली. यामागचं नेमकं कारण स्पष्ट करण्यात आलेलं नाही. ब्राझीलनेही आपली राजधानी बदलली होती. जवळपास २०० वर्षं रिओ डी जेनेरो ही ब्राझीलची राजधानी होती. मात्र १९६० मध्ये ब्राझिलियाला राजधानीचा दर्जा देण्यात आला. रिओ डी जेनेरोला प्रचंड गर्दी असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.

# पिवळ्या रंगावर काळी अक्षरें का?

देशभरात दररोज २२,५९३ रेल्वे धावतात. त्यात सुमारे १३,४५२ प्रवासी गाड्यांचा समावेश आहे. या माध्यमातून लाखो लोक प्रवास करतात. भारतातील सर्वात मोठे रेल्वे स्टेशन हावडा आहे. सर्वात व्यस्त रेल्वे स्थानकांच्या यादीतही त्याचा समावेश आहे.

भारतात एकूण रेल्वे स्थानकांची संख्या ७,३४९ आहे. भारतातील काही रेल्वे स्थानकांची नावे खूपच आश्चर्यकारक आहेत. परंतु आपल्या देशात अशा रेल्वे स्थानकांची कम तरता नाही, ज्यांची नावे वाचल्यानंतर किंवा ऐकल्यानंतर हसू आवरणार नाही. तूर्तास हा विषय मागे ठेवू या. पण रेल्वे स्थानकांची नावे पिवळ्या बोर्डांवर काळ्या रंगात का लिहिली जातात? हे जाणून घेऊ या. तर मंडळी, याम गे एक नाही तर अनेक कारणे आहेत.




**सतर्कतेचा संदेश**

रेल्वे स्टेशनचे नाव पिवळ्या बोर्डवर काळ्या अक्षरात लिहिण्याचे पहिले कारण म्हणजे पिवळा रंग खूप चमकदार रंग आहे. त्यामुळे रेल्वे चालकाला तो दुरूनच दिसतो. याशिवाय, पिवळा रंग थांबण्याचे संकेत देतो. पिवळे बोर्ड ट्रेनच्या लोको पायलटला वेग कमी करण्याचा किंवा सतर्क राहण्याचा इशारा देतो. अनेक रेल्वे स्थानकांवर गाड्या थांबत नाहीत, अशा गाड्यांचे लोको पायलट स्टेशनमध्ये प्रवेश केल्यापासून बाहेर पडेपर्यंत खूप सतर्क राहतात आणि सतत हॉर्न वाजवत राहतात. यामुळे स्टेशनवर उपस्थित प्रवासी सतर्क होतात.

**दुरून दिसण्यासाठी**

पिवळा रंग इतर रंगांपेक्षा खूपच प्रभावी असून रात्रीच्या अंधारातही तो दुरून दिसतो. याशिवाय, हे रंग डोळ्यांना खूप आराम देतात. पिवळ्या बोर्डवर काळ्या रंगात लिहिलेली स्टेशनची नावे दुरूनच दिसतात. या कारणांमुळे अशी रचना केलेली दिसते.

# मुलीच्या लग्नाआधीच आई जावयाबरोबर पसार

प्रेमाला वय किंवा मर्यादा नसते. प्रेम नात्यांकडे पाहत नाही ना प्रसंगाकडे त्याचे लक्ष असते. या संदर्भात अलीगढमधील एक धक्कादायक घटना सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मुलीच्या लग्नाची तारीख जवळ येत होती तसतसे सून आणि जावयातील प्रेम वाढत होते. याचा परिणाम असा झाला की, लेकीचे लग्न होण्यापूर्वीच सासू जावयासह घरातून पळून गेली.

संबंधित प्रकरणी सासू आणि जावई तास न तास फोनवर एकमेकांशी बोलत असत. मद्रक पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मनोहरपूर गावात जितेंद्र नावाच्या व्यक्तीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, की जावई त्यांच्या पत्नीसह पळून गेला आहे. सासू जावयासह घरातून सुमारे ५० हजार रुपये घेऊन पळून गेल्याची माहिती आहे. सोन्या-चांदीच्या दागिन्यासह पाच लाख रुपयांचा ऐवज घेऊन ती जावयाबरोबर फरार झाली.

**स्मार्टफोनची किमया**


झाले असे की, सासूने आपल्या होणाऱ्या जावयाला स्मार्टफोन भेट म्हणून दिला होता. यातूनच दोघे सतत बोलत



असत. या बाईच्या लेकीचे लग्न १६ एप्रिलला होणार होते; परंतु त्याअगोदरच जावई आणि सासू हे दोघे पसार झाले. जितेंद्र कुमार म्हणतात, की मुलीच्या लग्नाची सगळी तयारी पूर्ण झाली होती. मुलीला सन्मानाने घरी पाठवण्याचे त्यांचे स्वप्न होते. मात्र अचानक त्यांची पत्नी घरातून गायब झाली. सुरुवातीला ती कोणत्यातरी नातेवाइकाच्या घरी गेली असावी असे वाटले; मात्र ती न परतल्याने शोध सुरु करण्यात आला. तिकडे मुलीचा होणारा नवराही घरातून बेपत्ता असल्याचे समजले. यानंतर मोबाईल डिटेल्स काढले असता कुटुंबीयांना धक्का बसला.

# अत्तराच्या वासामुळे महिला विमानातच भिडल्या

विमानातील दोन प्रवाशांमध्ये अंगाचा आणि परफ्यूमचा वास यावरून झालेल्या वादाला हिंसक वळण लागले. त्यात फ्लाइट अटेंडंट जखमी झाला. शरीराच्या दुर्गंधीवरून प्रवाशांमध्ये झालेल्या भांडणात फ्लाइट अटेंडंटच्या हाताला प्रवाशाने चावा घेतला. शरीराच्या दुर्गंधीवरून दोन महिला प्रवाशांमध्ये भांडण झाले. एका महिला प्रवाशाने दुसरीच्या शरीराच्या दुर्गंधीवर अस्वस्थता व्यक्त केल्यावरुन हाणामारी सुरू झाली, तर दुसरीने पहिलीच्या अत्तराच्या तीव्र वासावर आक्षेप घेतला. या वादाचे रुपांतर मारामारीत झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आलेल्या फ्लाइट अटेंडंटवर हल्ला करण्यात आला. त्याच्या हाताला चावा घेतला गेला आणि आणखी एका प्रवाशालाही ओरखडे आले.



**भांडणामुळे विमान दोन तास लेट**

विमान कंपनीने या घटनेची पुष्टी केली असून जखमी फ्लाइट अटेंडंटला किरकोळ दुखापत झाल्यामुळे ताबडतोब रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगितले आहे. आता तिची प्रकृती स्थिर आहे. या प्रवासी महिलांमध्ये वाद सुरू झाल्यावर दोन महिला फ्लाइट अटेंडंट आणि दोन पुरुष सहकाऱ्यांनी भांडण थांबवण्याचा प्रयत्न केला. पण यामध्ये एकजण जखमी झाली. घटनेनंतर दोन्ही प्रवाशांना पोलिसांनी ताब्यात घेतले. प्रवासाचा पहिला टप्पा संपल्यानंतर फ्लाइटमधील इतर प्रवाशांना उतरवण्यात आले आणि नंतर फ्लाइट दोन तासांच्या विलंबाने निघाली. विमानाला उशीर झाल्याने उर्वरित प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागले.

# करांची करकिर



आपण आयकर भरतो. पाणीपट्टी, घरपट्टी तसंच इतर विविध माध्यमातून कर वसूल केला जातो. पण तुम्ही कधी उन्हासाठी किंवा सावलीसाठी कर भरला आहे का? नाही ना, पण काही देशांमध्ये यासाठीही कर घेतला जातो. जगभरातल्या अशाच काही विचित्र करपद्धतींविषयी...

* अमेरिकेतल्या ऑर्कन्स राज्यात शरीरावर टॅटू गोंदवल्यास सहा टक्के कर भरावा लागतो.
* स्पेनमधल्या बॅलरिक बेटांवर २०१६ पासून सन टॅक्स वसूल केला जातो. युरोपातल्या देशांमध्ये सूर्यप्रकाश खूप कमी काळ असतो. म्हणूनच मुबलक सूर्यप्रकाश असणाऱ्या या ठिकाणी पर्यटकांची बरीच गर्दी होते. त्यांच्याकडून हा कर घेतला जातो.




* अमेरिकेत २०१० पासून टॅनिंग टॅक्स वसूल केला जातो. पाश्चिमात्य देशांमध्ये त्वचेच्या कर्करोगाचं प्रमाण वाढत चाललं आहे. या कर्करोगाला आळा घालण्यासाठी टॅनिंग कर वसूल केला जात आहे.
* हंगेरीत २०११ पासून डबाबंद खाद्यपदार्थांमध्ये साखर आणि मीठाचं प्रमाण जास्त असणाऱ्या कंपन्याकडून कर वसूल केला जातो.

अमेरिकेतल्या अलबामा राज्यात पत्त्याचा कॅट खरेदी करणाऱ्यांकडून कर वसूल केला जातो.

# मुलांच्या हाती रेल्वेची जबाबदारी



एखाद्या रेल्वेस्थानकाची सगळी जबाबदारी महिला सांभाळत असल्याचं तुम्ही ऐकलं असेल. पण रेल्वेस्थानकावरची सगळी कामं लहान मुलं करत असल्याचं फारसं ऐकिवात नसेल. मात्र हंगेरीची राजधानी बुडापेस्टमधल्या डोंगराळ भागातल्या जंगलात असणाऱ्या एका रेल्वे स्थानकावर सगळी कामं करण्यासाठी लहान मुलांची नियुक्ती करण्यात आली आहे. गार्ड, स्टेशन मास्टर, तिकिट तपासनीस, तिकिट खिडकीवरचे कर्मचारी म्हणून ही मुलंच काम बघतात. इथे काही मुलं गणवेशात असतात तर काही गणवेशाशिवायही काम करतात. या रेल्वे स्थानकावरून विशेष ट्रेन धावते. ही ट्रेन ४० मिनिटांमध्ये ११ किलोमीटर अंतर कापते. ४० ते ५० प्रवासी या ट्रेनमध्ये बसू शकतात. इथे फारशी वर्दळ नसते. काही लोक फक्त मुलांचं काम बघण्यासाठी इथे येतात. एकेकाळी हंगेरी हा सोव्हियत युनियनचा भाग होता. त्यावेळी मुलांना जबाबदारीची जाणीव करून देण्यासाठी ऋपायोनिअर रेल्वेफ सुरू करण्यात आली होती. त्या काळी प्रौढांसोबत मुलंही इथे काम करायची. हंगेरी स्वतंत्र झाल्यानंतरही या स्थानकावर ही प्रथा सुरू ठेवण्यात आली आहे.

# नगर तालुक्यातील ९८ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर

### अनेक ग्रामपंचायतीत पहिल्यांदाच जनतेतून होणार सरपंच निवड, महिला राखीवसाठी २४ एप्रिलला सोडत

नगर – नगर तालुक्यातील सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी ९८ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत २३ एप्रिल रोजी दुपारी न्यू आर्टस् कॉलेज–मधील सभागृहात काढण्यात आले आहे. शालेय विद्यार्थिनी ईश्वरी ढवळे हिच्या हस्ते राखीव ग्रामपंचायतीच्या नावाच्या चिठ्या काढण्यात आल्या. तहसीलदार संजय शिंदे, नायब तहसीलदार अभिजित वांढेकर यांच्या उपस्थितीत झालेल्या आरक्षण सोडतीला तालुक्यातील गावागावातील राजकीय कार्यकर्ते उपस्थित होते. या सामाजिक प्रवर्गनिहाय आरक्षण सोडतीनंतर २४ एप्रिल रोजी त्याच ठिकाणी प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या उपस्थितीत महिला राखीवसाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. आरक्षण जाहीर झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पद थेट जनतेतून निवडण्यात येणार आहे. अनेक ग्रामपंचायत मध्ये पहिल्यांदाच जनतेतून सरपंच होणार आहेत.



नगर तालुक्यातील ९८ ग्रामपंचायतींपैकी सरपंचपदाच्या राखीव आरक्षणाची सोडत जाहीर करताना तहसीलदार संजय शिंदे. समवेत नायब तहसीलदार अभिजित वांढेकर व शालेय विद्यार्थिनी ईश्वरी ढवळे.

#### नगर तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण

**पूर्वीचे कायम ठेवण्यात आलेले आरक्षण–** भोयरे खुर्द – अनुसूचित जाती स्त्री राखीव, पारेवाडी (पारगाव) – अनुसूचित जाती स्त्री राखीव, बुरुडगाव– अनुसूचित जमाती स्त्री राखीव, पारगाव भातोडी – सर्वसाधारण, भोयरे पठार – सर्वसाधारण स्त्री राखीव, मजले चिंचोली – सर्वसाधारण स्त्री राखीव, आव्हाडवाडी – सर्वसाधारण.

**अनुसुचित जातीसाठी राखीव ग्रामपंचायती** – सांडवे, हिवरेबाजार, कामरगाव, चिचोंडी पाटील, टाकळी खातगाव, पांगरमल, सारोळा कासार, वारुळवाडी, आठवड, धनगरवाडी, मांडवे, भोरवाडी, अकोळनेर जाधववाडी

**अनुसुचित जमातीसाठी राखीव ग्रामपंचायती** – पिंपळगाव माळवी, जेऊर, खातगाव टाकळी, देहरे.

**ना.मा.प्र.साठी राखीव ग्राम पंचायती** – पिंप्री घुमट, रांजणी, शिराढोण, रुईछत्तीसी, गुंडेगाव, इसळक, मांजरसुंबा, ससेवाडी, बहिरवाडी, निंबळक, सारोळा बद्दी, डोंगरगण, कर्जुने खारे, इमामपुर, अरणगाव, पारगाव मौला, नारायणडोहो, खंडाळा, उदरमल, नांदगाव व कोळपे आखाडा, हमीदपूर, पिंपळगाव कौडा, वाळुंज, खडकी, मेहेकरी, शहापूर केकती, देऊळगाव सिध्दी, मठपिंप्री.

**सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव ग्रामपंचायती** – शिंगवे व इस्लामपूर, बाबुर्डी घुमट, विळद, आगडगाव, निमगाव घाणा, रतडगाव, पिंपळगाव उज्जैनी, देवगाव, शेंडी, वडगाव गुप्ता, पोखर्डी, नवनागापूर, बुऱ्हाणनगर, घोसपुरी, कापूरवाडी, बाबुर्डी बेंद, निमगाव वाघा, टाकळी काझी, जखणगाव, उक्कडगाव, पिंपळगाव वाघा, मदडगाव, दरेवाडी, हिवरेझरे, वाकोडी, दहीगाव, सोनेवाडी (चास), साकत खुर्द, चास, राळेगण, दशमी गव्हाण, वडगाव तांदळी, निंबोडी, गुणवडी, कोल्हेवाडी, वाटेफळ, वडारवाडी, तांदळी वडगाव, बाराबाभळी, आंबीलवाडी, भातोडी पारगाव, खोसपुरी, कौडगाव व जांब, नागरदेवळे, पिंपळगाव लांडगा, नेप्ती, सोनेवाडी (पि.ला.), खांडके, हिंगणगाव, बारदरी, माथणी व बाळेवाडी, हातववण, वाळकी.





सिद्धार्थनगर झोपडपट्टी परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य झाले व ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून या परिसराची स्वच्छता करून पाणीपुरवठा सुरळीत करून सर्व ड्रेनेज लाईन नवीन टाकण्याच्या मागणीचे मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना परिसरातील नागरिक.

# सिद्धार्थनगर झोपडपट्टी परिसरातील नागरी समस्यांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### पिण्याच्या पाणीपुरवठा विस्कळीत होऊन घरासमोरील ड्रेनेज लाईन वरतून वाहत असल्याने परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य

नगर – सिद्धार्थनगर परिसरातील नागरी समस्या वाढत असून तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे तसेच नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा देखील विस्कळीत झाला असून घरासमोरील ड्रेनेज लाईनचे पाणी वरतून वाहत असून सर्व परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य झाले व ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले असून या परिसराची स्वच्छता करून पाणीपुरवठा सुरळीत करून सर्व ड्रेनेज लाईन नवीन टाकण्याच्या मागणीसाठी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी माजी नगरसेवक अनिल शेकटकर, शिवराष्ट्र सेना पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण जगधने, लक्ष्मी धाडगे, शारदा दिनकर, कविता शेलार, यमुना राजगुरू, शोभा केदारे, अलका साबळे, सरिता ठोकळ, पार्वती वैराळ, उषा शेकटकर, गणेश पठारे, गणेश राजगुरू, अनिल वैराळ, संदेश शेकटकर, राहुल शेकटकर आदी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, सिद्धार्थनगर झोपडपट्टीमधील ड्रेनेज लाईन गेली कित्येक दिवसापासून उघड्यावर वाहत असुन या संदर्भात नागरिकांच्या सह्यानेशी अर्ज केला होता परंतु त्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही. सदरची ड्रेनेज लाईन मनपा कर्मचारी गज घालून लाईन चालू करतात परंतु दोन तासाने पुन्हा ड्रेनेज लाईन उघड्यावर वाहू लागते कारण सदरची ड्रेनेज लाईन संपूर्णपणे गाळाने भरलेली आहे. त्यामुळे तेथे राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तेथे लहान लहान मुलं त्या घाण पाण्यातून चालतात व तसेच घरामध्ये प्रवेश करतात त्यामुळे लहान मुलांच्या व मोठ्या व्यक्तींच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे व परिसरातील कचरा देखील उचलला जात नाही तसेच पाणीपुरवठा हा गेल्या काही महिन्याभरापासून पूर्णपणे विस्कळीत झालेला आहे. या अगोदर पाण्यासंदर्भात कुठलीही तक्रार अथवा समस्या नव्हती. लाल टाकी रोड ते साठे चौक या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खोदकाम झाल्याने त्या ठिकाणी असलेले वॉल नादुरुस्त खोदकाम करत असताना त्यांना मोठ्या प्रमाणात तडे गेले आहेत.

तरी संबंधित वॉल मॅन व इंजिनियर यांना वारंवार कल्पना देऊन देखील पाणीपुरवठा सुरळीत अद्यापपर्यंत झालेला नाही तरी परिसरातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# स्वच्छतेचा नगरमध्ये उडाला बोजवारा

*(पान १ वरुन)*

अधिकाऱ्यांना पाहण्यास वेळ मिळत नाही काय? अशी शंका उपस्थित होत आहे.

नगर शहरात नागरिकांनी रस्त्यावर टाकलेला कचरा दोन ते तीन दिवस उचलला जात नाही, यामुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढिगारे साचत आहेत. हे ढिगारे पाहून शहरातील स्वच्छतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. नगरकर गेल्या अनेक वर्षापासून पाणी, स्वच्छता, लाईट, रस्ते या सुविधा चांगल्या मिळण्यासाठीच अजून लढा देत आहेत असे अजून किती वर्ष चालणार आणि लोकांना कर भरून सुद्धा या समस्यांमधून सुटका कधी मिळणार की कायम या समस्या अशाच राहणार आहेत.

महानगरपालिकेकडून स्वच्छता मोहीमेवर लाखो रुपये खर्च केले जात आहेत. मात्र ते फक्त कागदोपत्रीच खर्च झाल्याचे दाखविले जात आहेत काय? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. ही बाब अतिशय गंभीर असून यात महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी लक्ष घालून संबंधित विभागाचे विभाग प्रमुख, स्वच्छता निरीक्षक यांची झाडाझडती घेण्यात यावी, तसेच दैनंदिन स्वच्छता व कचरा संकलनाच्या कामात सुसूत्रता आणावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ६ ते ८ दिवसानंतर केडगावला होतोयं पाण्याचा पुरवठा, दोन दिवसाआड पुरवठा करा अन्यथा आंदोलन करणार

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका अंतर्गत केडगाव उपनगर भागात ६ ते ८ दिवसानंतर महापालिका द्वारे पिण्याच्या पाणी चा पुरवठा केला जातो मात्र हा पाणीपुरवठा अत्यंत कमी दाबाने होऊन कमी वेळेपुरता चालू असतो त्यामुळे अनेक घरांना पिण्याचे पाणी भेटत नाही व उन्हाळ्याच्या दिवसात परिसरात पाणीटंचाई झाली असून पाण्याची भटकंती करावी लागत असल्याने महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला आहे. त्यामुळे केडगाव परिसरातील पाणीपुरवठा हा पूर्ण क्षमतेने देऊन २ दिवसाआड पाणी सोडण्यात यावे व पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याच्या मागणीसाठी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी श्री गुरुदेव दत्त सेवा ट्रस्टचे अध्यक्ष महेश सरोदे, बापूसाहेब कोतकर, नवनाथ लोंढे, पांडुरंग कोतकर, मनोहर बगळे, केदार सर, महादेव सातपुते, सचिन कोतकर, अभी ठूबे, राजू हुलगे, शुभम पावसे, अरविंद बहिरकर, परमेश्वर आवटी, राम सरोदे, सागर कराळे, करण परदेशी, ऋषिकेश ठुबे, संदीप भांडारकर, गोरख हुलगे आदीसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.



६ ते ८ दिवसानंतर केडगाव उपनगराला पाणीपुरवठा होत असून त्याबाबत उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना देताना नागरिक.

निवेदनात म्हटले आहे की, पाणीटंचाई व वाढीव पाणीपट्टी वर महानगरपालिका द्वारे या पाणीपट्टी मध्ये वाढ करण्यात आली आहे तरी या वाढीव पाणीपट्टी बाबत विचार करण्यात यावा व केडगाव परिसरामध्ये उच्च दाबाने पाणीपुरवठा २ दिवसाआड करण्यात यावा अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# गोमांस विक्री करणाऱ्या सर्जेपुरातील ३ दुकानांवर छापे

नगर – गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री करणाऱ्या तीन दुकानावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २२ एप्रिल रोजी कारवाई करत ९३ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन तिघांना ताब्यात घेतले.

या बाबतची माहिती अशी की पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी दिलेल्या आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या पथकातील पोलीस अंमलदार नगर शहरातील अवैध धंद्याची माहिती घेत असताना त्यांना माहिती मिळाली की, तनवीर कुरेशी, शहानूर कुरेशी हे त्यांचे सर्जेपुरा येथील दुकानामध्ये गोवंशीय जातीचे जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री करत आहेत.

पथकाने मिळालेल्या माहितीवरुन सर्जेपुरा येथील दुकानांची पाहणी केली असता ३ दुकानांमध्ये गोमांस विक्री होत असल्याचे दिसून आले. या पथकाने तनवीर सत्तार कुरेशी (वय ४०, रा.सुभेदार गल्ली, आर.आर.बेकरी जवळ, अ.नगर), शहानूर मुस्ताक कुरेशी (वय २२, रा.बाबा बंगाली, झेंडीगेट) व एक १५ वर्षीय अल्पवयीन मुलगा यांना ताब्यात घेतले. पथकाने त्यांच्या दुकानातून ९३ हजार २०० रुपये किंमतीचे २८५ किलो गोमांस, वजन काटे, वजन मापे, लोखंडी सत्तुर, सुरा, टोचा असा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तिघांविरुध्द बी एन एस २०२३ चे कलम २७१, ३२५, ३(५) सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम सन १९९५ चे सुधारीत २०१५ चे कलम ५ (ब) (क), ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

#### तोफखाना पोलिसांचीही सर्जेपुरा येथे कारवाई

शहरातील सर्जेपुरा कौलारु येथे साई बेकरीच्या मागे गोमांस विक्री होत असलेल्या दुकानात तोफखाना पोलिसांनीही २२ एप्रिल रोजी दुपारी छापा टाकून गोमांस विक्री करणारा शानू मुस्ताक कुरेशी (वय २२, रा. चार नंबर शाळेजवळ, व्यापारी मोहल्ला, झेंडीगेट) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून १२ हजार रुपये किमतीचे ६० किलो गोमांस, वजन काटा, लोखंडी सत्तूर व लोखंडी माप असा १३ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल सुमित गवळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शानू कुरेशी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नालेगाव येथील गावठी दारु अड्ड्यावर छापा

नगर – नालेगाव परिसरातील गाडगीळ पटांगण येथे बेकायदेशीररित्या सुरु असलेल्या गावठी हातभट्टी दारु अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी २२ एप्रिल रोजी दुपारी कारवाई करत ११ हजार रुपयांची दारु जप्त करुन एकास ताब्यात घेतले. या प्रकरणी सोमेश सदानंद खंडागळे (वय २७, रा. गाडगीळ पटांगण, टांगेगल्ली, नालेगाव) याच्या विरुद्ध पो.कॉ. रामनाथ हंडाळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महाराष्ट्र दारु प्रतिबंध कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी मेहेरबाबा यांच्या समाधीवर प्रार्थना

#### केडगाव मॉर्निंग ग्रुपने घातले साकडे

नगर – माजी आमदार अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी केडगाव मॉर्निंग ग्रुपच्या वतीने मेहेराबाद (ता. नगर) येथील अवतार मेहेरबाबा यांच्या समाधी स्थळी प्रार्थना करण्यात आली.



अरुण जगताप यांच्या स्वास्थ्यासाठी केडगाव मॉर्निंग ग्रुपच्या वतीने मेहेराबाद येथील अवतार मेहेरबाबा यांच्या समाधी स्थळी प्रार्थना करण्यात आली.

अरुण जगताप यांच्यावर पुणे येथील एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी व त्यांना चांगले आरोग्य लाभण्यासाठी अवतार मेहेरबाबा यांच्या समाधीवर मनोभावे प्रार्थना करण्यात आली. तर काका लवकर बरे होवून शहरात समाजकारणात पुन्हा सक्रीय होण्यासाठी साकडे घालण्यात आले. यावेळी प्रकाश पवार, दिलीप दुधावने, भाऊसाहेब फलके, अण्णासाहेब शिंदे, महेश दळवी, अनिल भोर, सचिन घेंबुड, बंटी विरकर, उमेश सुंबे आदी उपस्थित होते.

# निम्मा उन्हाळा संपत आला तरी वाडियापार्क जलतरण तलाव बंदच

### तातडीने सुरु करण्याची मागणी, जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांना निवेदन

नगर – शहरातील वाडिया पार्क येथील जलतरण तलाव काही महिन्यापासून बंद आहे, दरवर्षी उन्हाळ्यात तरी हा तलाव क्रीडाप्रेमींना पोहण्यासाठी सुरु केला जातो, मात्र यावर्षी निम्मा उन्हाळा संपत आला तरी तो सुरु करण्यात आलेला नाही, त्यामुळे तो तातडीने सुरु करण्याची मागणी करण्यात आली आहे.



वाडिया पार्क येथील जलतरण तलाव पोहण्यासाठी सुरु करण्याची मागणी निवेदनाद्वारे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्याकडे करताना ऋषिकेश गुंडला.

या संदर्भात जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांची ऋषिकेश गुंडला यांनी भेट घेवून निवेदन दिले आहे. यामध्ये म्हंटले आहे की, सर्व सामान्य घरातील क्रीडा प्रेमींना, खेळाडूंना त्यांचे क्रीडा प्रेम जोपासण्यासाठी प्रभावी पायाभूत क्रीडा सुविधांची निर्मिती करण्याच्या उद्देशाने शासनाने कोट्यावधी रुपये खर्चून वाडिया पार्क येथे जिल्हा क्रीडा संकुलाची उभारणी केलेली आहे. या मध्ये इतर सर्व प्रकारच्या खेळांच्या मैदानाबरोबरच पोहण्यासाठी सर्व सुविधांयुक्त जलतरण तलावही बांधण्यात आलेला आहे.

या तलावात वर्षभर जलतरण पटू पोहण्याचा सराव करत असतात, तर उन्हाळ्याच्या दिवसांत शहरातील अनेक नागरिक, मुले पोहण्यासाठी येत असतात. परंतु गेल्या काही महिन्यांपासून हा जलतरण तलाव बंद आहे. निम्मा उन्हाळा संपत आला तरी तो सुरु करण्यात आलेला नाही. त्यामुळे तो लवकरात लवकर चालू करावा तसेच सामान्य जनतेस परवडेल अशी माफक दरात २० रुपये तिकीट व क्लास फी २०० रुपये महिना अशी ठेवावी अशी मागणी गुंडला यांनी केली आहे.

# इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून विद्यार्थी व पालकांची आर्थिक पिळवणूक थांबवा अन्यथा ‘धडा शिकवणार’

#### जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्यांना मनविसेचे निवेदन

नगर – अहिल्यानगर शहरात असलेल्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधून विद्यार्थी व पालकांची मोठ्याप्रमाणात आर्थिक पिळवणूक केली जात आहे. शहरातील शाळा या मनमानी कारभार करत पालकां–मधून अवास्तव पैशांची लुट करत आहेत. विद्यार्थ्यांवर अनेक अन्यायकारक फतवे लादत शालेय साहित्य, पुस्तके, कपडे, बूट, इत्यादी वस्तू शाळेने ठरवून दिलेल्या दुकानातूनच घ्यावे, वार्षिक स्नेहसंमेलनासाठी मुलांकडूनच प्रत्येकी ११०० रूपये घेणं, पुढच्या वर्षीची फी आगाऊ घेणे आदी प्रकार सर्रासपणे सुरु आहेत. शिक्षण विभागाचे या प्रकारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे. विद्यार्थी व पालकांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या या शाळांवर तातडीने कारवाई करावी अन्यथा विद्यार्थ्यांच्या हितासाठी आम्हीच या शाळांना धडा शिकवू, असा इशारा मनसे विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित वर्मा यांनी जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

सुमित वर्मा यांच्या नेतृत्वाखालील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील यांना निवेदन दिले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, शहराध्यक्ष अनिकेत शियाळ, स्वप्निल वाघ, प्रविण गायकवाड, अमोल भालसिंग आदी उपस्थित होते.

यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरातील काही इंग्रजी माध्यमांच्या शाळा या शिक्षण मंडळापेक्षा मोठ्या आहेत का? जिल्हा परिषद शिक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांच्या आदेशांना इंग्रजी माध्यमांच्या शाळा कायमच केराची टोपली दाखवत आहे. सध्या या शाळांमध्ये कमिशन काढण्याची स्पर्धाच लागली असल्याचे कळाले. शहरातील शाळेत मनमानी कारभार होत आहे. नविन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच या शाळांकडून पालकांना ५ ते १० हजार रूपये आगाऊ रक्कम मागितली जात आहे. शाळेतच विद्यार्थ्यांची शैक्षणिक किट तयार करून विक्री केली जात आहे. शाळेने हा विक्रीचा धंदा कधीपासून सुरू केला? शिक्षणसंस्था अश्या प्रकारची बळजबरीने विक्री करू शकतात का? वार्षिक स्नेहसंमेलनाला ११०० रूपये विद्यार्थ्यांकडून घेणं कितपत योग्य आहे? विद्यार्थ्यांवर अजब फतवे लादले जात आहेत शालेय साहित्य, पुस्तके, कपडे, बूट, इत्यादी शाळेने ठरवून दिलेल्या दुकानातूनच घ्यावे, वार्षिक स्नेहसंमेलनासाठी मुलांकडूनच प्रत्येकी ११०० रूपये घेणं, पुढच्या वर्षीची फी आगाऊ घेतली जाते हे प्रकार वाढले आहेत. या शाळा संबधित दुकानदारांकडून २५ ते ३० टक्के कमिशन घेत आहेत. या शाळा पालकांना व विद्यार्थ्यांना वेठस धरून बळजबरीने या आदेशांचे पालन करायला लावत आहे.

आता लवकरच नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. पण अशा काही गोष्टी शाळांच्या माध्यमातून वारंवार घडत आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधील हा प्रकार आम्ही वारंवार आपणास निदर्शनास आणून दिलेलं आहे. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांची मुजरी कायम वाढत चाललेली आहे. मात्र शिक्षण विभागाचे या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष आहे. आपण यावर तात्काळ कारवाई करावी आणि सर्व शाळांना हा प्रकार थांबवण्याचे आदेश द्यावेत. विद्यार्थ्यांच्या हितासाठी आम्हीच या शाळांना धडा शिकवू, असा इशारा दिला आहे.

# सोबत दारु पीत नाही म्हणून तरुणास लाकडी दांडक्याने मारहाण

नगर – सोबत दारु पीत नाही आणि पाजत पण नाही या कारणावरून तरुणास शिवीगाळ करुन लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करुन जखमी केल्याची घटना नगर शहरात बुरुडगाव रोडवरील गव्हर्नमेंट आयटीआय कॉलेजचे गेट समोर २२ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता घडली.

याबाबत हर्षल दीपक काळभोर (वय २९, रा. काळभोर चाळ, भोसले आखाडा, बुरुडगाव रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे फिर्यादी हा गव्हर्नमेंट आयटीआय कॉलेजच्या गेट समोर कट्ट्यावर मित्रांसह बसलेला असताना तेथे दीपक शिंदे उर्फ म्हम्या आला व म्हणाला तुला माझ्यासोबत दारु पिण्यास सांगितले तर पीत नाही आणि पाजत पण नाही असे म्हणून शिवीगाळ केली. काही कळायच्या आत त्याने लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. या मारहाणीत डोक्याला जखम झाल्याने फिर्यादी हर्षल हा जखमी झाला.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात हर्षल काळभोर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संदीप शिंदे यांच्याविरुद्ध मारहाणीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

# तरुणाच्या डोक्यात काचेची बाटली फोडत मारहाण; गुन्हा दाखल

नगर – तुम्ही लय मोठे झाले. नवीन घर घ्यायला लागले, असे म्हणून शिवीगाळ करून तरुणाच्या डोक्यात काचेची बाटली फोडत मारहाण केल्याची घटना २२ एप्रिल रोजी सायंकाळी महात्मा फुले चौकात घडली.

याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात पुष्कर राजेंद्र हरबा (वय २७, रा. बुरुड गल्ली, धरती चौक) याने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की २२ एप्रिल रोजी सायंकाळी सहा वाजताच्या सुमारास चुलत भाऊ रुपेश हरबा (रा. जानकी मेडिकल शेजारी, सारसनगर) याला भेटण्यासाठी पायी जात असताना सावत्र बहिणीचा पती मयूर अशोक गोंडळकर (रा.लाल टाकी, अ.नगर) हा मोपेड गाडीवर आला. फिर्यादीला म्हणाला की, तुम्ही हरबा लय मोठे झाले. नवीन घर घ्यायला लागले. असे म्हणून शिवीगाळ केली. मोपेड गाडीच्या पुढील भागात ठेवलेली काचेची बाटली काढून पुष्कर याच्या डोक्यात मारली. या माराने पुष्कर हा जखमी झाला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पुष्कर हरबा यांनी दिलेले फिर्यादीवरून मयूर गोंडळकर याच्याविरुद्ध मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

